


संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा



सर्व समाज बांधवांना
बागुल पंडुगा
सणाच्या हार्दिक शुभेच्छा!




सर्व विश्वस्त-पंचकमेटी पद्मशाली ज्ञाती समाज
व श्री मार्कंडेय मंदिर देवस्थान कमेटी, अ.नगर



रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहमदनगर, गुरुवार दि. २५.०७.२०२४ | अंक नं. १२४ | वर्ष ६७ वे | दैनिक वर्ष ६१ वे | ANR/022/2018-2020


# पोलिस दलातील गैरकारभाराच्या चौकशीसाठी समिती स्थापन; पंधरा दिवसात अहवाल सादर करण्याचे महासंचालकांचे आदेश

## लेखी आश्वासनानंतर खासदार निलेश लंके यांचे उपोषण चौथ्या दिवशी सुटले; माजी मंत्री आमदार बाळासाहेब थोरात यांची शिष्टाई यशस्वी

नगर – जिल्हा पोलिस दलातील स्थानिक गुन्हे शाखेच्या हप्ते वसुलीच्या तसेच इतर गैरकारभाराच्या चौकशीसाठी गेल्या ४ दिवसांपासून जिल्हा पोलिस अधीक्षक कार्यालयासमोर उपोषणास बसलेले खा. निलेश लंके यांचे उपोषण राज्याच्या पोलिस महासंचालिका रश्मी शुक्ला व नाशिक विभागाचे पोलिस महानिरीक्षक दत्तात्रय कराळे यांच्या आश्वासनानंतर गुरुवारी (दि.२५) दुपारी स्थगित करण्यात आले.

माजी महसुलमंत्री बाळासाहेब थोरात यांच्या हस्ते ज्यूस पिवून खा. लंके यांनी व त्यांच्या समवेत उपोषण करणारे माजी नगरसेवक योगीराज गाडे व अशोक रोहोकले यांनी उपोषण सोडले. खा. लंके यांच्या उपोषणस्थळी माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी गुरुवारी दुपारी भेट देवून लंके यांच्याशी चर्चा केली. त्यानंतर त्यांनी थेट राज्याच्या पोलिस महासंचालिका रश्मी शुक्ला यांच्याशी फोनवर चर्चा केली. तसेच नाशिक विभागाचे पोलिस महानिरीक्षक दत्तात्रय कराळे यांच्याशीही २-३ वेळा संवाद साधला. त्यांच्याशी झालेली चर्चा लंके व आंदोलनस्थळी असलेल्या महाआघाडीच्या पदाधिकारी कार्यकर्त्यांनाही मोबाईलच्या स्पिकरवर ऐकवली. पोलिस महासंचालिका रश्मी शुक्ला यांनी खा. लंके यांच्या तक्रारींची १५ दिवसात नि:ष्पक्ष चौकशी करण्याची ग्वाही दिली. तसेच पोलिस महानिरीक्षक कराळे यांनीही खा. लंकेंच्या मागण्यांप्रमाणे चौकशीही ग्वाही देत चौकशी अधिकारी म्हणून नाशिक ग्रामीणचे अप्पर पोलिस अधीक्षक यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमण्यात येत आहे. सदर चौकशी समितीकडून १५ दिवसात चौकशी अहवाल मागविण्यात येईल व चौकशी अहवाल प्राप्त होताच त्या अनुषंगाने पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येईल, असे लेखी आश्वासन दिले. ठोस आश्वासन मिळाल्यामुळे थोरात यांनी लंके यांना उपोषण सोडण्यास सांगितले. त्यानुसार लंके यांनी दुपारी उशिरा ४ दिवसांपासून सुरू असलेले आपले उपोषण सोडले.




गेल्या चार दिवसांपासून पोलिस अधीक्षक कार्यालयासमोर उपोषण करणारे खा. निलेश लंके, माजी नगरसेवक योगिराज गाडे, अशोक रोहोकले यांचे उपोषण सोडताना माजीमंत्री बाळासाहेब थोरात, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष जयंत वाघ, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र फाळके. समवेत अभिषेक कळमकर, विक्रम राठोड आदी. (छाया – बबलू शेख)


खरेदीवर आकर्षक गिफ्ट
आला रे आला राजपाल सेल आला..!
30 ते 70% डिस्काउंट सेल
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
• फ्रेश स्टॉक • आकर्षक गिफ्ट • भरपूर व्हरायटी • भरपूर डिस्काउंट
सावेडी अ.नगर (0241) 2999299
संगमनेर (02425) 222226
नारायणगाव (02132) 242132

फक्त 15 मिनिटात सोने तारण कर्ज
शुन्य टक्के प्रोसेसिंग फी
9% व्याजदर
प्रति तोळा ₹ 58000
लक्ष्मीनारायण सहकारी नागरी पतसंस्था मर्या.
7888219471, 9423167850
वागडपट्टी, अहमदनगर

शेती फुलवा आता
सुरक्षेसह...
सोलर CCTV कॅमेरा
24 तास नजर ठेवा
आपल्या शेतावर
Water Proof Camera
360 Degree View
Easy Mobile Acess
ISO 9001 : 2015 Certified
Mandar MuLay
98222 94622
94220 87757

गोविंदा ! गोविंदा !! गोविंदा !!!
श्री तिरुपती बालाजी
दर्शनसह श्री पद्मावती, गोविंदराज दर्शनसह कोल्हापूर महालक्ष्मी
दर्शनीय स्थळे
प्रतिव्यक्ती
₹ 6501/-
समाविष्ट गोष्टी
ऑफिस

डॉ.अद्वैत गिते
MBBS, MD (Medicine)
DM (Neurology)
न्युरो फिजिशिअन
* चेहऱ्यावरील स्नायू फडकणे यासाठी बोटॉक्स इंजेक्शनची सुविधा
* पाठदुखी/मज्जा रज्जूवरील आजारे
* डोळ्यांच्या नसांवरील सूज/ऑप्टीक न्यरैटिस
यावरील सर्व आजारांच्या निदानासाठी जपानमधील अत्याधुनिक सुप्रसिध्द निहोन- कोडेन कंपनीचे EEG, NCV, EMG मशीन उपलब्ध.
* सर्व आजारांसाठी ऍडमिट सुविधा उपलब्ध.
* सर्व नामांकित कंपन्यांचे कॅशलेस सुविधा उपलब्ध.
अक्षय (गिते) हॉस्पिटल
बालिकाश्रम रोड, कॉस्मिक सोसायटीशेजारी, अहमदनगर
मो : 9257575718, 9764416136
तपासणी शिबीर फक्त अक्षय (गिते) हॉस्पिटल येथे आहे
एशियन नोबल हॉस्पिटल प्रेमदान चौक, अ.नगर रोज दुपारी १ ते ५ या वेळेत

महाराष्ट्रातील सर्वात स्वस्त कापड मॉल महावीर मॉल
स्वस्त म्हणजे नक्की काय असतं..?
रेनकोट आणि छत्री महोत्सव
सर्व शालेय विद्यार्थ्यांचे आणि लेडीजचे रेनकोट मिळतील.
झील आणि वर्षा रेनकोट वर 20% डिस्काउंट
सर्वांचे सेल डिस्काउंट वाले आहेत.
आमचा सेल हा मुद्दल किंमतीत सर्व वस्तू मिळतील.
स्टॉक क्लिअर साठी ही ऑफर आजपासून सुरु करीत आहोत.
वेगळ्या ठिकाणी आले तरच वेगळेपण पाहायला मिळेल..
अधिक माहितीसाठी भेट द्या.. श्री महावीर कलेक्शन
मारुती मंदिरा समोर, मर्चंट बँके जवळ, मार्केटयार्ड, अ.नगर. Mo. 98222 52001

आकर्षक टॉईजवर
२५% सूट
आर.एन.आर्ट ॲण्ड क्राफ्ट
गिफ्ट ॲण्ड स्कूल स्टेशनरी | होलसेल ॲण्ड रिटेलर
एक्सक्लुझिव्ह गिफ्ट, पर्सनालाईझड गिफ्ट ॲण्ड टॉईज
काका खवावालासमोर, नेता सुभाष चौक, चितळेरोड, अ.नगर-४१४००१
मो : 9325329061/ 9373417113

VAISHNAVI TILES & TRADING CO.
• सर्व प्रकारच्या टाइल्स • ग्रॅनाइट • सॅनिटरी वेअर
• पीव्हीसी पाईप्स आणि फिटिंग • C.P. फिटिंग्ज
9590151515 | 9262515151
प्लॉट नं.5, हुंडेकरी शोरूमच्या मागे, सावेडी, अहमदनगर
VARMORA KERAKOLL CARYSIL colortile RAK NIRALI TIMEX ICON

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

## अरुण साधूंची वाचनीय 'शोधयात्रा'

काही लेखक, साहित्यिक अतिशय विलक्षण असतात. ही मंडळी ज्ञानप्राप्तीसाठी काल्पनिक पात्रांद्वारे शोधयात्रा घेत असतात. एकाने अरुण साधूंच्या शोधयात्रा पुस्तकाबद्दल आकलन करण्याचा प्रयत्न केला. यातील श्रीधर हा एका बड्या कॉर्पोरेट कंपनीत मोठा, सर्वोच असा अधिकारी. यशाच्या नशेनं झपाटलेला. तरीही तो समाधानी नव्हता. आतून बेचैन होता.

मी कोण? काय करतोय? माझ्या जीवनाचा हेतू काय? या अस्वस्थतेतूनच तो केबिनमधून बाहेर पडतो व कुणाला काहीही न सांगता तडक रेल्वेप्रवासाला लागतो. अंतरमनाची घालमेल व भूतकाळातील प्रश्नांचा उहापोह चालूच असतो.

एकदा आध्यात्मिक प्रश्नांचे उत्तर न मिळालेला श्रीधर कॉलेजमधील प्रा. शास्त्रींना आपली चलबिचल सांगतो. यावर सर त्याला म्हणतात, ''तू कधी प्रेम केलंय का?'' अर्थातच नाही. शास्त्री सर म्हणाले, ''जगाला, स्वतःला जाणून घ्यायचं असेल तर प्रेम करायला शिक. प्रेम म्हणजे काय हेही तुला स्वतःलाच शिकावं लागेल. ते तुला कुणीच शिकवू शकणार नाही.''

वाचनीय मननीय
प्रेरणादायी
अक्षरधन
संकलन : "मुसाफिर"–९८२२०२०६९१



श्रद्धा, प्रेमाच्या शोधात असणाऱ्या या प्रवाशाला एक सहप्रवाशी म्हणतो, स्वतःचा मार्ग स्वतःलाच शोधावा लागतो. श्रद्धा, प्रेम हवेच. परंतु नसलेली श्रद्धा व प्रेमभाव कुठून आणायचे, कसे प्राप्त करायचे हे सांगता येणार नाही. प्रेमाची एकूणच जीवनाची ही शोधयात्रा ज्याची त्यालाच करावी लागते. होय ना?

# नगर अर्बन बँकेचे दिवस पलटू लागले; बहुसंख्येने आंदोलनास पाठबळ द्यावे !

### बँक बचाव कृती समितीचे आवाहन

नगर – अगदी काही महिन्यापूर्वी नगर अर्बन बँकेविषयी कुत्सित उद्गार, बँकेची हेटाळणी, कुचेष्ठा केली जात होती. ४/१०/२०२३ रोजी बँक बंद पडल्यानंतर बँकेचे तत्कालीन चेअरमन संचालक अधिकारी ज्यांनी ज्यांनी बँक बंद पाडण्यात सहभाग घेतला ते सर्वजण अतिशय आनंदात दिवस साजरे करीत होते. मोठमोठे कर्जदारही आता आपणाला कर्ज भरण्याची जरूरी नाही त्यांना तत्कालिन चेअरमन, संचालक कर्ज भरू नका अशी ताकद देत होते. ते कर्जदारही बिनधास्तपणे मुक्त संचार करित होते.

दिवस पलटतात, असे म्हटले जाते त्याप्रमाणे आता बँकेचे दिवस पलटू लागलेले आहेत. बँक बंद पाडल्यानंतर अधिक त्वेषाने, जिद्दीने आणि जोमाने आणि चिवटपणे बँक बचाव संघर्ष समितिचे काम व चळवळ अधिक गतीमान व शक्तीने सुरू केली. निरंतर विचार विनीमय करून नियोजनबद्ध रितीने अंदोलने आयोजित केली. पहिला मोर्चा आयोजित झाला त्या मोर्चाची हेटाळणी सहन केली. थांबलो नाही पोलीस प्रशासनाचे लक्ष वेधण्यात यशस्वी झालो. अनेक प्रकारचे पत्रव्यवहार पोलीस प्रशासनासह केंद्रिय सहकार खाते अधिकारी यांचेकडे केले. परत दुसरा आसूड मोर्चा आयोजित करून पोलीस प्रशासनास या आंदोलनाची गंभीर दखल घेणे भाग पडले. सातत्याने भेटी गाठी चर्चा चालूच ठेऊन पोलीस प्रशासनाचे धिमे सहकार्य लाभू लागले. त्यामुळे बँकेचे संचालक चेअरमन सतर्क झाल्याने अटकेच्या भितीने परागंदा झाले. त्यातही आमचा संघर्ष चालूच राहिल्याने अंतिम परिणाम बँकेचे चेअरमन व दोन संचालकांची अटक अटळ झाली. त्या धक्क्याचा परिणाम इतर संचाकल अटकेच्या भितीने आजपर्यंत फरार झाले आहेत.

रस्ता रोको आंदोलन यशस्वी केले. त्याचा परिणाम आणखी काहीजण दोषी अधिकारी, कर्जदारांना पोलीसांनी ताब्यात घेतल्याने व त्यांच्यावर न्यायालयीन कारवाई सुरू झाली. त्यापुढे पोलीस प्रशासनाचे सहकार्य मिळू लागलेले आहे.

आणखी खूप महत्त्वाची अभिमानाची व आनंदाची बाब म्हणजे अहमदनगर जिल्हा न्यायालयाचे जिल्हा न्यायाधिश पी. आर. सित्रे हे खूपच सहृदयी व बँकेचे बाबतीत सहानुभूती ठेवणारे असे न्यायाधिश लाभले आहेत. पोलीस प्रशासनाने ताब्यात घेतलेल्या मोजक्याच का होईना १०–१५ आरोपी कर्जदारांना जामिन मंजूर केलेला नाही. इतकेच नाही तर अटकपूर्व जामिनासाठी आलेल्या अर्जाच्या सुनावणीतही आधी बँकेच्या कर्जाची रक्कम भरा नंतर जामीन बघू असे ठाम निर्धाराचे न्यायाधीश बँकेला लाभले हे बँकेचे दिवस पालटल्याचे संकेत दिसत आहे.

बँकेचे कर्ज भरायचेच नाही. आपले कोणी काही करू शकत नाही अशी भूमिका घेणाऱ्या व कित्येक दिवसापासून कर्ज थकबाकी असतानाही न जुमानणाऱ्या संगमनेर स्थित बडे राजकिय संरक्षण असणाऱ्या अमित पंडीत सारख्या खोट्या कर्जदाराला १६ कोटी थकबाकी भरणे भाग पडले. तसेच पुणे येथील मोठे कर्जदार सुशील अग्रवाल सारख्या कर्ज चुकवणाऱ्या महाठकालाही नुकतेच एक कोटी कर्ज भरणा करावाच लागला आहे. न्यायालयाचे न्यायालयीन परिणाम बँकेच्या कर्ज वसूलीत झाला आहे व पुढेही निश्चित होणार आहे. बँकेचे दिवस पालटायला सुरूवात झाली असे म्हणताना बँकेला लाभलेले बँकेचे अवसायक गणेश गायकवाड यांनी पदभार स्विकारताच बँकेच्या कर्जवसुलीस प्राधान्य देत त्यासाठी आवश्यक एक रकमी कर्जफेड योजना मंजूर करून आणण्यासाठी प्रयत्नाची पराकाष्ठा केली व ती एकरकमी कर्जफेड योजना नुकतीच मंजूर करुन आणली त्याचा फायदा मोठमोठ्या कर्जदारांना ते देऊ लागले आहेत.

बँकेची कर्जाची आतापावेतो ३० कोटी ८६ लाखांची वसूली झालेली आहे. शिवाय पाच लाखाच्या आतील ठेवीदारांना ६३ कोटीचा परतावा देण्यासाठी डी. आर. सी. ची ६५ कोटी ची विमा रक्कम पाठवून ही ६३ कोटीची ठेव रक्कम परवानगी अंती येत्या एक दोन महिन्यात ठेवीदारांना मिळणार आहे. एकरकमी कर्जफेड योजनेमुळे मोठ्या प्रमाणात थकबाकी कर्जाची वसूली होणार आहे. श्री. गायकवाड यांनी नुकतेच बँकेच्या कर्मचाऱ्यांना कर्तव्याची जाणीव करून देऊन बँकेच्या कर्जाची वसुली करण्यासाठी त्यांना कार्यप्रवण केले आहे. असे दैनंदिन २० ते २५ कर्मचारी ढोल ताशा झांज पथकांसह कर्जदारांच्या दारात जाऊन नेटाने कर्जाची वसुली करू लागले आहेत.

एक रकमी कर्जफेड योजनेतून कर्जाची मोठ्या प्रमाणात वसूली झाल्यानंतर आणखी अंदाजे ८० कोटी वसुली झाली तर ५ लाखांच्या वरील ठेवीदारांच्या रकमाही येत्या सहा महिन्यात परत मिळण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. शिवाय बँकेकडे सरप्लस निधी शिल्लक राहू शकेल व बँक पुन्हा पुनस्थापित होण्यास अडचण येणार नाही असा ठाम विश्वास अवसायक श्री. गायकवाड यांनी ठेवीदार संघर्ष समितीच्या सदस्यांबरोबर झालेल्या बैठकित व्यक्त केला आहे.

आम्ही कमी पडतो ते पोलीस दलाचे म्हणावे असे सहकार्य मिळत नसल्याने आम्ही बँक प्रेमी नागरिक, व्यापारी, उद्योजक, तरूण वर्गाला आवाहन करीत आहोत की, पोलीस दलांबरोबर वारंवार भेटीगाठी चर्चा हा सिलसिला चालू आहेच. यापूर्वीही त्यांना पत्रव्यवहार केलेला आहे. पोलीस दलाने बँकेची महाकाय प्रचंड आर्थिक घोटाळ्याचा फॉरेन्सिक ऑडिट शोध घेतलेला असून त्यातून प्रथम दर्शनी १०५ आरोपी निष्पन्न झालेले असून त्यापैकी जवळपास ८० ते ८५ आरोपींचा शोध अक्षपही लागलेला नाही. तसेच फॉरेन्सिक ऑडिटही अपूर्ण असून ते पूर्ण करून घेऊन त्यातून निष्पन्न होणारे २० ते २५ आरोपींचा शोध घेणे जरूरीचे आहे. ते सर्व पूर्ण करून सर्व आरोपिंना अटक होणे आवश्यक आहे. त्यासाठी पोलीस प्रशासनास वारंवार संपर्क करीत आहोत. परंतु पुनश्च लवकरच स्वतंत्र निवेदन देऊन १५ ऑगस्ट अखेरची डेड लाईन देऊन उर्वरीत आरोपींचा शोध घेण्यास अंतिम इशारा देऊन त्यानंतर फक्त तीन दिवसांची शॉर्ट नोटीस देऊन केव्हाही नगर औरंगाबाद रोडवर पोलीस अधिक्षक कार्यालयानजीक ११ ते ३ वाजेपर्यंत रस्ता रोको आंदोलन करण्याचा निर्णय घेण्यात येणार आहे. बँक पुर्नस्थापित होणेस्तव या आंदालनात उत्स्फुर्त सहभाग द्यावा, असे आवाहन बँक बचाव कृती समितीचे सदस्य डी. एम. कुलकर्णी यांनी केले आहे. पोलीस प्रशासनास आरोपीचा शोध घेण्याचे कार्य हाती घ्यावेच लागेल. आता बस झाले. किती दिवस तुम्ही बायका मुलांना घरच्या कुटुंबाला सोडून बाहेर रहाणार आहात ? बाहेरचे खाणार आहात ? किंवा बाहेर रहायचे म्हणजे पुन्हा नातेवाईकांना त्रास देणार आहात ? पावसापाण्याचे दिवस आहेत. बाहेरचे खाऊ पिऊ नका, प्रकृती बिघडेल. आता बस झाले. या परत आपल्या घरात. एखाद दिवस कुटुंबाबरोबर घालवा व दुसऱ्या दिवशी पोलीसांना शरण या नाहीतरी आता तुम्ही केलेल्या कुकर्माची जबाबदारी शासन आपणावर लवकरात लवकर निश्चित करणारा आहे. ती जबाबदारी पेलणे व त्या जबाबदारीची रक्कम भरणे आपणाला अटळ ठरणार आहे. मग आता बाहेर का दिवस घालवता. या तुमच्या व पोलीसांच्या दारात आनंदाने घालवा तुमच्यावरच्या जबाबदारीची रक्कम तातडीने भरा. पोलीसांवरील व बँक बचाव कृती समितीवरील भारही हलका करा, असे आवाहन समितीचे सदस्य डी. एम. कुलकर्णी यांनी फरार संचालक आणि अधिकाऱ्यांना केले आहे.

## विवाहितेची गळफास घेत आत्महत्या

नगर – विवाहित महिलेने अज्ञात करणातून राहत्या घराबाहेरील जिन्याला दोरीच्या सहाय्याने गळफास घेत आत्महत्या केल्याची घटना भिंगार मधील पोलिस लाईन समोरील आंबेडकर कॉलनीत बुधवारी (दि.२४) घडली. संजना सुनिल भोसले (वय ४४) असे या मयत महिलेचे नाव आहे.

मयत संजना यांनी बुधवारी पहाटेच्या सुमारास गळफास घेतला. ही बाब निदर्शनास आल्यावर त्यांचे पती सुनिल भोसले यांनी त्यांना बेशुद्ध अवस्थेत उपचारासाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात नेले मात्र तेथील मेडिकल ऑफिसर डॉ.ढगे यांनी त्यांना उपचारापूर्वीच मयत झाल्याचे घोषित केले. याबाबतची माहिती दवाखाना ड्युटीला असलेले तोफखाना पोलिस ठाण्यातील पो.हे.कॉ. जी. जी. गोर्डे यांनी भिंगार कॅम्प पोलिस ठाण्यात कळविली. या माहिती वरून पोलिसांनी आकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

## घरात गळफास घेत एकाची आत्महत्या

नगर – ४५ वर्षीय इसमाने अज्ञात करणातून राहत्या घरात फॅन च्या अँगलला दोरीच्या सहाय्याने गळफास घेत आत्महत्या केल्याची घटना नगर शहरातील काटवन खंडोबा परिसरात बुधवारी (दि.२४) रात्री घडली. सिकंदर बाबासाहेब साठे असे या मयत व्यक्तीचे नाव आहे.

मयत सिकंदर यांनी बुधवारी रात्री गळफास घेतला. ही बाब निदर्शनास आल्यावर त्यांचे बंधू विकास साठे यांनी त्यांना रात्री ९ च्या सुमारास बेशुद्ध अवस्थेत उपचारासाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात नेले मात्र तेथील मेडिकल ऑफिसर डॉ. बटूळे यांनी त्यांना उपचारापूर्वीच मयत झाल्याचे घोषित केले. याबाबतची माहिती दवाखाना ड्युटीला असलेले तोफखाना पोलिस ठाण्यातील पो.ना. बी.एच. गायकवाड यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात कळविली. या माहिती वरून पोलिसांनी आकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

## तरुणाची गळफास घेत आत्महत्या

नगर – एका २२ वर्षीय तरुणाने अज्ञात करणातून शेतातील पत्र्याच्या शेड मध्ये दोरीच्या सहाय्याने गळफास घेत आत्महत्या केल्याची घटना नगर नगर तालुक्यातील भातोडी गावच्या परिसरात बुधवारी (दि.२४) दुपारी घडली. रजनीकांत गोपीनाथ कोहक असे या मयत तरुणाचे नाव आहे.

रजनीकांत याने बुधवारी दुपारी गळफास घेतला. ही बाब निदर्शनास आल्यावर त्याचे मामा बाबू शहाजी लबडे यांनी त्यास दुपारी ३.३४ च्या सुमारास बेशुद्ध अवस्थेत उपचारासाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात नेले मात्र तेथील मेडिकल ऑफिसर डॉ. खेडकर यांनी त्यास उपचारापूर्वीच मयत झाल्याचे घोषित केले. याबाबतची माहिती दवाखाना ड्युटीला असलेले तोफखाना पोलिस ठाण्यातील पोलिस अंमलदाराने नगर तालुका पोलिस ठाण्यात कळविली. या माहिती वरून पोलिसांनी आकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

# उड्डाणपूल दुर्घटनेवरून दोषपूर्ण कामासाठी जबाबदार असणाऱ्यांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करा

### माजी खा. डॉ. सुजय विखे पाटील व आ. संग्राम जगताप यांच्यावर टीका

नगर – उड्डाणपुला वरून एक मोठा आयशर ट्रक थेट खाली कोसळल्यामुळे दुर्घटना घडली आहे. यामध्ये एकाचा प्राण गेला असल्याची प्राथमिक माहिती समोर येत असून काही लोक गंभीररित्या जखमी असल्याचे समजते आहे. या घटनेवरून शहर काँग्रेस जिल्हाध्यक्ष किरण काळे यांनी या पुलाच्या दोषपूर्ण कामासाठी जबाबदार असणाऱ्या अधिकारी, ठेकेदार, राजकीय नेते यांच्यावर सदोष मनुष्य वधाचा गुन्हा दाखल करण्याची जाहीर मागणी पोलीस प्रशासन आणि सरकारकडे केली आहे. हा उड्डाणपूल म्हणजे मृत्यूचा सापळा झाला आहे.



किरण काळे

किरण काळे यांनी म्हटले आहे की, यापूर्वी देखील या उड्डाणपुलावर अनेक अपघाताच्या घटना घडल्या आहेत. यामध्ये अनेक लोक गंभीरित्या जखमी झाले असून काहींना प्राण गमवावे लागले आहेत. हा उड्डाणपूल म्हणजे आता मृत्यूचा सापळा झाला आहे. मुळात या पुलाचे काम करताना इंजीनियरिंगच्या दृष्टिकोनातून आवश्यक असणाऱ्या बाबींची योग्य ती पूर्तता करण्यात आलेली नाही. काम देखील निकृष्ट रित्या करण्यात आले आहे. त्यामुळे कोट्यावधी रुपये खर्च करून नागरिकांना मात्र हाती काहीच आलेले नाही. काही दिवसांपूर्वी उड्डाणपुलाचा एक मोठा भाग भाग कोसळून खाली पडल्यामुळे शहरातील एका चार चाकी चालकाचा अपघात पुलाखाली झाला होता. त्यावेळी चार चाकी असल्यामुळे सदर व्यक्ती बालमबाल वाचली होती. हा सिलसिला काही थांबायचे नाव घेत नाही. त्यामुळे नगरकरांमध्ये या उड्डाणपूला वरून व खालून देखील जाण्याबाबत मोठी भीती मनामध्ये निर्माण झाली आहे.

काळे यांनी या बाबत उड्डाणपूलाच्या कामाचे श्रेय घेणाऱ्या माजी खा. डॉ. सुजय विखे पाटील व आ. संग्राम जगताप यांच्यावर टीका केली आहे. केवळ राजकीय श्रेय घेण्याकरिता अट्टाहास करत सदोष काम करण्यास प्रशासकीय यंत्रणेला दबाव टाकत भाग पाडले गेले. अधिकारी, ठेकेदार देखील या दबावाला बळी पडले. या कामात सर्वांनी संगनमत करत मोठा भ्रष्टाचार केला आहे. त्यामुळेच दोषपूर्ण काम करत केवळ कोट्यावधी रुपयांची बिले लाटली गेली. मात्र यामध्ये सर्वसामान्यांचा जीव जात आहे. ही गंभीर बाब आहे. वारंवार घडणाऱ्या या घटनांना जबाबदार असणाऱ्या व्यक्तींवर तात्काळ सदोष मनुष्य वधाचा गुन्हा दाखल करावा, अशी काळे यांनी प्रशासनाकडे जाहीर मागणी केली आहे.

## सोहन कोतकर यांचे दीर्घ आजाराने निधन



नगर – केडगाव वेशीजवळ राहणारे सोहम भिमराज कोतकर (वय २५) या तरूणाचे २५ जुलै रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर केडगावच्या अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले. भूषणनगर येथील श्री अॅल्युमिनियम ग्लास वर्कचे ते संचालक होते. त्यांच्या पश्चात आजी, आई, १ भाऊ, भावजय असा परिवार आहे.

## लक्ष्मीबाई आंधळे यांचे निधन



नगर – कामरगाव (ता.नगर) येथील लक्ष्मीबाई बाबूराव आंधळे (वय ९७) यांचे २२ जुलै रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात ३ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

माजी सुभेदार भाऊसाहेब आंधळे, अॅड. प्रताप आंधळे, जयसिंग आंधळे यांच्या मातोश्री होत.

## सुनील लुंकड (वाकोडीवाला) यांचे संथारा व्रतात निधन



नगर – तालुक्यातील वाकोडी येथील व्यापारी सुनील घेवरचंद लुंकड (वाकोडीवाला), (वय ६०) यांचे २४ जुलै रोजी दुपारी तीनच्या सुमारास संथारा व्रतात निधन झाले.

त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सुन, मुली – जावई, नातवंडे असा परिवार आहे. वाकोडी वि.का. सोसायटीचे संचालक प्रदीप लुंकड यांचे ते कनिष्ठ बंधू होत.

## अशोकराव येनगुल यांचे वृद्धापकाळाने निधन

नगर – सेवानिवृत्त लेखापरिक्षक अशोकराव येनगुल यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर २५ जुलै रोजी नालेगाव, अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्यामागे पत्नी, तीन मुले, एक मुलगी, सूना, नातवंडे असा परिवार आहे. ते माताजी श्री निर्मला देवी यांचे असीम भक्त होते. ते सहज योग कार्यात हिरारीने सहभागी होत.

## सौ.पारूबाई कोकाटे यांचे अल्प आजाराने निधन

नगर – चिचोंडी पाटील (ता.नगर) येथील रहिवासी सौ. पारूबाई महादेव कोकाटे (वय ७५) यांचे २३ जुलै रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. २४ जुलै रोजी चिचोंडी पाटील गावच्या अमरधाममध्ये त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्यामागे पती, १ मुलगा, ३ मुली, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. शिक्षकनेते महादेव कोकाटे यांच्या त्या पत्नी तर सोसायटीचे संचालक संदीपकाका कोकाटे यांच्या त्या मातोश्री होत.



मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहमदनगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

## उड्डाणपुलावरून टेम्पो कोसळला; मालकाचा मृत्यू तर चालक जखमी

### चालक जखमी, चांदणी चौकातील वळणावरील घटना



नगर – शहरातील उड्डाणपुलावरून माल–वाहतुक करणारा आयशर टेम्पो (क्र.एमएच २० जीसी ६४५०) खाली कोसळून झालेल्या अपघातात टेम्पोचा मालक ठार झाला तर चालक जखमी झाला. हा अपघात बुधवारी (दि.२४) दुपारी चारच्या सुमारास चांदणी चौक परिसरात उड्डाणपुलावरील वळणावर झाला.

जळगावहून छत्रपती संभाजीनगर मार्गे पुण्याकडे भरधाव वेगात जाणाऱ्या टेम्पो चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले व उड्डाणपुलाचा कठडा तोडून टेम्पो खाली कोसळला. त्यामुळे संरक्षण विभागात कठड्याचेही नुकसान झाले. अपघातानंतर घटनास्थळी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. वाहनात पीव्हीसी पाईप व प्लंबिंगचे सुटे भाग होते.

अपघातात टेम्पो मालक पांडुरंग बन्सी गेलोत (वय ४३, रा. जंभाळा, जि. छत्रपती संभाजीनगर) यांचा जागीच मृत्यू झाला. तर चालक दादासाहेब कारभारी सपकाळ (वय ३३, रा.जंभाळा, जि. छत्रपती संभाजीनगर) हा जखमी झाला आहे, त्याला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. पोलिसांनी क्रेनच्या साह्याने अपघातग्रस्त टेम्पो बाजूला काढून वाहतूक सुरळीत करण्यात आली.

या अपघाताचा प्राथमिक तपास करून मयताची ओळख पटविण्याचे काम पो.हे.कॉ. महेश विधाते यांनी केले.



मार्केटयार्ड चौकातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अर्धाकृती पुतळा महापालिकेच्या आवारात बसवावा, या मागणीचे निवेदन मनपा आयुक्त यशवंत डांगे यांना देताना आंबेडकर चळवळीतील कार्यकर्ते.

# मार्केटयार्ड चौकातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अर्धाकृती पुतळा महानगरपालिकेच्या आवारात बसवा

### महानगरपालिका आयुक्त यांना निवेदन

नगर – अहमदनगर शहरामध्ये आंबेडकरी समाजाच्या संघर्षातून व मनपाच्या सहकार्यातून विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्ण कृती पुतळा मार्केटयार्ड चौकात बसवण्यात येत आहे. त्याचे काम ही जलद गतीने सुरू असून येत्या दोन ते तीन महिन्यात पूर्ण कृती पुतळा बसवण्यात येणार असून तेथील अर्धाकृती पुतळा हा मार्केटयार्ड चौकात सध्या आहे.

पूर्णाकृती पुतळा झाल्यानंतर अर्धाकृती पुतळ्याचा प्रश्न निर्माण होण्यापेक्षा संविधान काराचा पुतळा हा प्रत्येक सरकारी कार्यालय मनपा, न्यायालय इत्यादी ठिकाणी असतोच त्याच धर्तीवर विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा अर्धाकृती पुतळा हा मनपाच्या आवारात बसवण्यात यावा या मागणीचे निवेदन विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पूर्ण कृती पुतळा समिती व समस्त आंबेडकरी समाजाच्या वतीने मनपा आयुक्त यशवंत डांगे यांना देण्यात आले.

यावेळी अजय साळवे, सुरेश बनसोडे, सुमेध गायकवाड, रोहित आव्हाड, संजय कांबळे, वैभव जाधव, किरण दाभाडे, येसुदास वाघमारे, सचिन जमधडे, संजय जगताप, पोपट जाधव, कौशल गायकवाड, विशाल भिंगारदिवे, सागर ठोकळ, नगरसेवक राहुल कांबळे, विशाल गायकवाड, बाळासाहेब निकम, सिद्धांत गायकवाड, नगरसेवक प्रशांत गायकवाड आदी उपस्थित होते.

# केडगावमध्ये मेंढपाळाच्या तंबूतून दागिन्यांची चोरी; गुन्हा दाखल

नगर – केडगावच्या इंडस्ट्रीयल एरिया समोरील नेमाणे इस्टेट या मोकळ्या मैदानात मेंढ्यांचा तळ असताना तेथे ठोकलेल्या तंबूमधून मेंढपाळाच्या मालकीच्या सोन्या चांदीचे दागिने असलेली पत्र्याची पेटी अज्ञात चोरट्याने चोरून नेली आहे. दि. २० जुलै रोजी सकाळी १० ते सायंकाळी ६ या कालावधीत ही चोरी झाली असून या प्रकरणी बुधवारी (दि.२४) कोतवाली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत संतोष किसन बरकडे (वय ३५, रा. पळशी, ता.पारनेर) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांचा मेंढ्यांचा कळप असून मेंढ्या चरण्यासाठी ते गावोगाव जात असतात. दि. २० जुलै रोजी त्यांचा मेंढ्यांचा तळ केडगावच्या इंडस्ट्रीयल एरिया समोरील नेमाणे इस्टेट या मोकळ्या मैदानात होता. तेथे निवाऱ्यासाठी त्यांनी तंबू ठोकलेला होता. या तंबू मध्ये विविध जीवनावश्यक वस्तूंसह कुटुंबातील महिलांचे सोन्या चांदीचे दागिने एका पत्र्याच्या पेटीत ठेवलेले होते.

अज्ञात चोरट्याने त्यांची नजर चुकवून दागिने ठेवलेली पत्र्याची पेटी चोरून नेली. या फिर्यादीवरून पोलिसांनी अज्ञात चोरट्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# गृहिणी

## आरोग्य

### आरोग्यदायी 'ब्लॅक टी'

* ब्लॅक टीमध्ये पॉलिफिनॉल्स असते, ज्यामुळे तंबाखू आणि इतर विषारी पदार्थांमुळे होणाऱ्या नुकसानापासून बचाव होतो. पॉलिफिनॉल्ससारखे अँटी ऑक्सिडंट्समुळे कॅन्सरचा धोका होतो. ब्लॅक टीमधील तत्त्वामुळे हाडे मजबूत होण्यास मदत होते.

* जेवणानंतर नियमित दोन केळी सेवन केले तर पचनक्रिया सुरळीत चालते. एक ग्लास दुधात एक चमचा तूप व चिमूटभर इलायची पूड मिसळावी. हे दूध केळीसोबत प्यावे. केळी नियमित खाल्ल्याने शरीर स्वस्थ होऊन स्मरणशक्तीत वाढ होते.

## पाककला

### पनीर कशीश

**साहित्य** – एक किलो पनीर, एक किलो खवा, पाव किलो शेवया, दोन लिटर दूध, दोन किलो साखर, शंभर ग्रॅम बदाम, शंभर ग्रॅम काजू, आईस्क्रीम इसेन्स किंवा चार चमचे वेलदोडा–जायफळ पूड, केशर किंवा खाण्याचा रंग.

**कृती** – दोन लिटर दूधात पूर्ण साखर विरघळून घ्यावी. बदाम, काजूचे काप करून घालावे. दोन चमचे इसेन्स अथवा वेलदोडा–जायफळ पूड त्यात घालावी. केशर घालणार असल्यास अर्धी वाटी गरम दूधात चांगले खलून ते दूध त्यात मिसळावे.

आता एका कढईत खवा तूप सुटेपर्यंत परतून ताटात काढून घ्यावा. शेवया मोडून त्याच कढईत चांगल्या गुलाबी–तपकिरी रंगावर परतून घ्याव्या. पनीरचे छोटे चौकोनी तुकडे करून ते हलके परतून (शॅलो फ्राय करून) घ्या. तुपात न करता रिफाईंड तेलात परतून घ्या. हे सर्व जिन्नस तयार दूधात नीट मिसळून घ्यावे. खिरी इतके पातळ नको आणि श्रीखंडाइतके घट्टही नको अशी त्याची घनता असली पाहिजे.

## सल्ला

### कोफ्ते बनवताना

* कोणत्याही जिनसाच्या कोफ्त्याच्या साहित्यात बेसनासोबत थोडीशी दाट मलई मिसळल्यास कोफ्त्याचा स्वाद द्विगुणित होतो.

* स्टीलची भांडी, सिंक व नळाच्या तोट्या इ. स्वच्छ करण्यासाठी सोडा वापरा. त्यामुळे ती नव्यासारखी चमकू लागतील.

* भात उरल्यास वाटून, उन्हात वाळवून घ्या व तळून खा.

* भांड्यांचा तेलकटपणा घालवण्यासाठी त्यात लिंबाचा रस घाला. तेलकटपणा जाईल.

* गरम पाण्यात टोमॅटो थोड्या वेळ बुडवून ठेवल्याने साले पटकन निघतात.

## वास्तू

* मेन गेटच्या ठीक समोर लाकडी, लोखंडी खांब, विजेचा खांब, वृक्ष, पिलर असू नये. चिंच व मेंदीचे झाड असू नये, वाईट शक्तींचा वास या वृक्षांवर असतो.

* बेडरुममध्ये २ बदकांचे किंवा २ पोपटांचे चित्र लावावे.

## सौंदर्य

* त्वचेवर दररोज मध लावल्यास त्वचेवरील डाग कमी होतात. तसेच त्वचेचा रुक्षपणाही नाहीसा होतो.

* १ कप दही, १ चमचे भिजवून, वाटून मेथी दाणे पेस्ट, १ चमचा निमपावडर व चुटकीभर हळद एकत्र करून चेहऱ्यावर लावा. सुकल्यावर चेहरा धुवून टाका.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा, नगर.**

# दैनिक पंचांग

शुक्रवार, दि. २६ जुलै २०२४

**---, शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, आषाढ कृष्णपक्ष, उ.भा. १४।३०, सूर्योदय ०६ वा. २९ मि. सूर्यास्त ०६ वा. २७ मि.**

## राशिभविष्य

**मेष** :लोकांमध्ये मतभेद आणि अनोळखी लोकांचा विरोध आपणास अस्वस्थ करू शकते. उत्साहवर्धक बातमी मिळाल्याने आनंद होईल.

**वृषभ** : जोखीम घेण्याच्या वृत्तीचे प्रश्नांच्या सोडवणूकीसाठी नवीन मार्ग काढण्याच्या आपल्या गुणांचे वरिष्ठांकडून कौतुक होईल. निर्णय घेण्यासाठी दिवस चांगला नाही.

**मिथुन** : कार्यक्षेत्रातील एखाद्या कल्पक सर्जनशील कार्यात प्रगति होईल, एखाद्या ओळखीच्या व्यक्तीबरोबर सामंजस्य वाढेल. इच्छित कार्ये योग्य वेळी होतील.

**कर्क** :मीटिंगच्या माध्यमातून शिकवण्याची किंवा शिकण्याची संधी मिळण्याची शक्यता आहे. व्यापारात आपल्या सेवेच्या मोबदल्यात योग्य लाभ मिळेल. आर्थिक लाभ होईल.

**सिंह** : आज नवीन संबंध स्थापित करणे, माहितीची देवाण–घेवाण, कसोटी घेणारा हा दिवस आहे. मानसिकता बदलेल. करीयरसंदर्भातील संधी मिळण्याची शक्यता.

**कन्या** : आपणास अधीर आत्मविश्वासाने परिपूर्ण वाटेल प्रतिस्पर्धी प्रयत्नासाठी किंवा एखाद्या अशा कार्यासाठी हा वेळ उत्तम आहे. यथायोग्य विचार करून कार्य कराल.

**तूळ** : प्रवासाचे योग संभवतात. वाहने काळजीपूर्वक चालवा. ठरविलेले पूर्ण करण्यासाठी असे प्रसंग प्रेरणादायी ठरतील.

**वृश्चिक** : अत्यंत परिश्रम केल्यानंतर थोडे यश मिळेल. आरोग्य मध्यम राहील. वाद–विवाद टाळण्याचे प्रयत्न करा. निष्कारण प्रश्नांचा त्रास राहील.

**धनु** : वेळेकडे लक्ष ठेवा. कार्यात अत्यंत व्यस्त राहाल. खर्च वाढेल. कार्यक्षेत्रात मानसिक ताण होण्याची शक्यता आहे. महत्वपूर्ण प्रश्नांचे निराकरण होईल.


**मकर** : आनंदाचे वातावरण असल्यामुळे कार्य सुरळीत होतील. महत्वपूर्ण कार्यांमध्ये यश मिळेल. मित्रांचा पाठिंबा राहील. इतर योजना आणि उपक्रम नेहमीसारखेच चालू द्याल.

**कुंभ** : मनातल्या इच्छा पूर्ण होतील. उत्साहजनक बातम्या मिळतील. कौटुंबिक वातावरण आनंदाचे राहील. आपणास गरज असेल तेव्हा कुटुंबियांचे सहकार्य मिळेल.

**मीन** : मित्रांचा लाभ मिळेल. मानसन्मान होईल. आपल्यासाठी अनुकूल वेळ आहे व महत्त्वाच्या कार्यांमध्ये यश मिळेल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा, नगर.**

## फिल्मीचक्कर क्र. ११४८ सौ. शैलजा कुलकर्णी




**आडवे शब्द :-** १) जॉय मुखर्जी, साधना यांचा एक चित्रपट ६) ++ मेमसाब (चित्रपटाचे नाव) ७) कल आज और ++ (चित्रपटाचे नाव) ८) अंधा +++ (चित्रपटाचे नाव) ९) ++ का पंछी (चित्रपटाचे नाव) १०) धर्मेंद्र, हेमामालिनी यांचा एक चित्रपट १२) ++ नारायण (जुन्या काळातील एक अभिनेत्री) १४) ++ भरो सजना (चित्रपटाचे नाव) १५) देव आनंद, हेमामालिनी यांचा एक चित्रपट १६) शेखर कपूर, डिंपल कापडिया यांचा एक चित्रपट १७) गोविंदा, मंदाकिनी यांचा एक चित्रपट

**उभे शब्द :-** १) धर्मेंद्र, राजेंद्रकुमार, तनुजा, कुमकुम, रमेश देव, नझीर हुसेन, सुजितकुमार, मनमोहन यांचा एक चित्रपट २) +++ धरम (चित्रपटाचे नाव) ३) ++ खून (चित्रपटाचे नाव) ४) जितेंद्र, श्रीदेवी, राजेश खन्ना, जयाप्रदा, कादरखान यांचा एक चित्रपट ५) ++ बादशाह (चित्रपटाचे नाव) ९) शम्मी कपूर, तान्या सिंह, प्रेम चोप्रा, किशनकुमार यांचा एक चित्रपट ११) राजीव कपूर, मंदाकिनी यांचा एक चित्रपट १२) हम ++ प्रेम कर ना जाने प्यार के दुष्मनों को हजारों मे पहचाने (गाणे) १३) ++ दिया जाय या छोड दिया जाय बोल तेरे साथ क्या (गाणे) १५) राजेंद्रकुमार, सायराबानो यांचा एक चित्रपट

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : ज्यांना स्तुती करून घेण्याची अत्यंत हौस असते, ते वास्तविक पाहता त्या लायकीचे नसतात.

## मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

### स्निकोमीटर काय करतं?

गोलंदाज वेगानं चेंडू फेकतो. युवराज सिंग तेवढ्याच वेगानं तो मारू पाहातो. पण चेंडू पाठी जाऊन यष्टिरक्षकाच्या हातात विसावतो. तो आणि गोलंदाज जोरदार अपील करतात. चेंडू युवराजच्या बॅटची कडा घेऊन नंतर यष्टिरक्षकाकडे गेला असं अंपायरला वाटलं तर तो अर्थातच युवराजला बाद देतो. याउलट चेंडू बॅटच्या कडेच्याजवळून, पण त्या कडेला स्पर्श न करता तसाच पुढे गेला असला तर अर्थात फलंदाज नाबाद असतो. अंपायरला याचा निर्णय काही क्षणात द्यायचा असतो; आणि तोही आपल्या डोळ्यांवर व कानावर विसंबत. डोळ्यावर विसंबायचं तर चेंडूचा वेग भन्नाट असतो. कानांवर विसंबायचं तर मैदानावरील प्रेक्षक इतका आरडाओरडा करत असतात, की त्या पार्श्वभूमीवर चेंडूच्या बॅटवर होणाऱ्या आघताचा आवाज कसा ऐकू यावा? स्निकोमीटर इथंच मदतीला येतं. ते नेमका याचा आघाताच्या आवाजाचा वेध घेतं. यासाठी यष्टीवर एक अतिशय संवेदनशील शक्तीशाली मायक्रोफोन लावलेला असतो. तसंच पिचच्या खालीही दुसरा एक मायक्रोफोन असतो. हे तिथं होणाऱ्या बारीकसारीक आवाजाचीही नोंद ध्वनिलहरीच्या रूपात ठेवत असतात. जर चेंडूचा हलकासाही आघात बॅटवर झालेला असेल तर त्या क्षणी ध्वनीलहर उंचावते. तिचा माथा वर चढतो. पण तो नुसताच बॅटच्या जवळून गेला असेल तर हीच लहर सपाट राहाते. ज्या क्षणी चेंडू आणि बॅट एकमेकांच्या जवळ आलेले असतात, त्या क्षणी या ध्वनीलहरीचं रूप काय होतं हेच स्निकोमीटर सांगतं. त्यावरून मग फलंदाज बाद आहे की नाबाद आहे हे अंपायरला ठरवता येतं. अर्थात, मैदानावरच्या अंपायरला ही सुविधा नसते. पण तंबूत असलेल्या थर्ड अंपायरला स्निकोमीटर सोय उपलब्ध असते. आजकाल अंपायरच्या निर्णयावर अपील करण्याची सुविधा काही सामन्यांमध्ये दिली जाते. अशा वेळी मग मैदानावरचा अंपायर थर्ड अंपायरकडे विचारणा करून आपला निर्णय ठरवू शकतो.

या स्निकोमीटरच्या जोडीला आता हॉट स्पॉट नावाचं तंत्रज्ञान उपलब्ध झालेलं आहे. ते तंत्रज्ञान अवरक्त म्हणजेच इन्फ्रारेड किरणांच्या मदतीनं खेळाचं चित्रण करत असतं. जिथं तापमान चढलेलं असतं. तिथं उष्णतेचं उत्सर्जन होतं. ते अवरक्त किरणांच्या माध्यमातून दिसू शकतं. अंधारात शत्रूचा ठावठिकाणा लावण्यासाठी सैनिकांकडे ही यंत्रणा उपलब्ध असते. कारण आपल्या शरीराच्या तापमानाला अनुसरून अवरक्त किरण प्रसारित होत असतात. त्यांचा वेध घेता येतो. जेव्हा चेंडूचा आघात बॅटवर होतो तेव्हा त्या ठिकाणचं तापमान किंचितसं चढतं.

### करायला गेलो एक, अन् झाले भलतेच

एका गाढवाचा मालक माळी होता. भाजीपाल्याची ओझी वाहून गाढव बरेच वैतागले होते. म्हणून त्याने देवाची आळवणी केली, ''देवा मला दुसरा मालक मिळाला, तर बरे होईल.'' देवाने त्याची आळवणी ऐकून त्याला मालक म्हणून कुंभार दिला.

माती, मडकी वाहून– वाहून गाढवाला तेथेही खूप कंटाळा आला होता. 'नको हे काम,' असे म्हणत त्याने पुन्हा देवाची विनवणी केली आणि म्हटले,'' देवा या कुंभारापेक्षा दुसरा एखादा मालक मला मिळाला, तर बरे होईल.'' देवाने त्याचे म्हणणे मान्य करून त्याला चर्मकार मालक मिळवून दिला. काही दिवसातच गाढव कंटाळून रडकुंडीला येत मनात म्हणाले, '

'माझ्याइतका महामूर्ख कोणी नसेल. देवाला सांगून मी मालक म्हणून चर्मकार मिळविला, पण हा तर पहिल्या दोघांपेक्षाही एखाद्या क्रूर राक्षसासारखा आहे. जिवंतपणी हा इतक्या यातना देत आहेच, पण मेल्यानंतर माझे कातडेही हा फुकट घालवणार नाही. त्याचेही पैसे करील.'' असे म्हणत गाढव अश्रू ढाळू लागले.

**तात्पर्य** : आहे त्यात समाधान न मानता जास्त हावरटपणा केला, तर दुःख झाल्याशिवाय राहत नाही.

## जीवन चक्र



अशाच प्रकारे असे सुध्दा होऊ शकत की, आम्ही नूतन तंत्रज्ञान मिळण्याकरीता एक कॉम्प्युटर (संगणक) विकत घेऊ इच्छितो तेव्हा आमच्या असे लक्षात येते की त्याचे सर्व योग्य सॉफ्टवेअर आणि इतर यंत्र विकत घेण्याकरीता आम्हांला जास्त कष्ट करावे लागतील आणि लवकरच आमच्या असे लक्षात येते की सध्या कॉम्प्युटर ने आम्ही आनंदी नाहीत. आम्ही कॉम्प्युटरला अधिक वेगवान आणि कार्यक्षम बनवू इच्छितो. पुढे आमच्या असे लक्षात येते की, ज्या कॉम्प्युटरमुळे आमचा वेळ वाचावयचा होता त्यातच आमचा वेळ जात आहे. कॉम्प्युटर शिकण्याकरीता आम्हांला अनेक तास द्यावे लागतात. इंटरनेट शोधण्यात आम्ही कित्येक तास घालवितो. ई–मेल ज्याद्वारे आमचा एकमेकांशी संपर्क अधिक लवकर झाला आहे, तो आमचा जास्तीत जास्त वेळ घेत आहे. अचानक आमच्या असे लक्षात येते की, दर दिवशी पन्नास लोक आपल्याला ई–मेल पाठवत आहेत आणि त्यांची इच्छा असते की आम्ही लगेचच त्यांना उत्तर पाठवावे. आम्ही जर त्यांना लगेच उत्तर दिले नाही तर ते आमच्यावर असंवेदनशील आणि उदासीन असल्याचा आरोप करतात. म्हणून आम्ही कॉम्प्युटर करीता अनेक तास खर्च करतो. आम्ही आमच्या संपत्तीचे, वस्तुंचे गुलाम बनून जातो. आम्ही आमचे बंधन कशाप्रकारे तोडू शकतो. आम्हांस सोडून देणे आणि मुक्त होण्याची आवश्यकता आहे. कायमस्वरूपी न राहणाऱ्या वस्तूंविषयी असणाऱ्या आपल्या इच्छा जेव्हा आम्ही सोडु तेव्हाच आम्ही मुक्त होऊ शकतो. तेव्हा आमचा आत्मा त्या प्रेम आणि सौंदर्याचा अनुभव करू शकेल. जे परमात्मा, प्रभु आम्हांला देऊ इच्छितात. खरा आनंद तेव्हाच मिळतो जेव्हा आम्ही आमच्या अंतरी असणाऱ्या आनंदाच्या स्त्रोताशी अर्थात प्रभु परमात्म्याशी जोडले जातो. हे सर्व करण्याकरीता आम्हाला नक्कीच आमचे ध्यान संसारातील आकर्षणांपासून हटविले पाहिजे आणि आपल्या अंतरी नादास ऐकले पाहिजे. प्रभुचे मधुर संगीत सदैव आमच्या अंतरी चालू आहे. ज्योती आणि प्रेम आमच्या अंतरी झगमगत आहे. पैशांनी भरलेली मुठ सोडल्याने सुरईतील अडकलेला आमचा हात निघू शकतो. **(कृपाल आश्रम, अहमदनगर)**

## शुद्ध जीवन जीने के मंत्र

सन २०११ में अपनी खेती में पहले गेहूँ, सोयाबीन, चना, गन्ना तथा केले पर इसका प्रयोग आरम्भ किया तो बहुत अच्छे परिणाम मिले। सन् २०१४ में अपनी ४ एकड़ जमीन में सोयाबीन बोये। उसमें दो एकड़ यौगिक खेती और दो एकड़ रासायनिक खेती थी। रासायनिक खेती में बहुत खाद डालनी पड़ी और बार–बार कीटनाशक दवाई भी छिड़कनी पड़ी। फिर भी ११ क्विंटल सोयाबीन प्राप्त हुए। इसकी तुलना में यौगिक खेती में हमने सबसे पहले जमीन शुद्धिकरण किया, बीज को भी परमात्म याद में संस्करण किया, फिर बुआई की।

इसके बाद तीन बार उस खेती में जीवामृत छोड़ा, दो बार बायोडाईजेस्टर का पानी छोड़ा और बाबा की शक्तियों का भी प्रयोग किया गया। इसके बाद हमने सूर्योदय और सूर्यास्त के समय सूर्य से निकलनेवाली लाल किरणें और परमात्मा की लाल–सुनहरी किरणों को पौधों पर बिखेरते हुए अनुभव किया। इस प्रकार संकल्प करने से पौधों में बहुत वृद्धि हुई। संकल्प किया कि फूलों की अनेक शाखायें निकल रही हैं...। उनमें मोतियों जैसे दाने भर रहे हैं... ऐसा हर रोज़ संकल्प से विजूवलाइजेशन किया और सही में बहुत ही सुन्दर और अच्छी फसल आयी। और एक बात, हर हफ्ते सेन्टर के सभी राजयोगी भाई–बहनें हमारे खेत पर आकर संगठित रूप में योग करते हैं। शुद्ध, शान्त एवं पवित्र किरणें पूरे वायुमण्डल में फैलाते हैं। आस–पासवाले किसान बाबा के झण्डे को देख पूछने आते थे। फिर हम उनको यौगिक खेती के बारे में समझानी देते थे। यह यौगिक खेती की पद्धति एक नये तरीके से सेवा करने का एक महत्वपूर्ण जरिया बन रहा है।

यौगिक खेती से प्रति एकड़ साढ़े तेरह क्विंटल सोयाबीन की फसल हुई। जो रासायनिक खेती से डेढ़ क्विंटल ज्यादा हुई। अभी हमारे खेत में गन्ना, चना और केले पर योग के प्रयोग चालू हैं। अन्त में सभी किसान भाई बहनों को यही सन्देश देना चाहता हूँ कि आप भी यौगिक पद्धति से खेती करने की विधि को अपनाओ और स्वयं के साथ परिवार को भी सुखी बनाओ।

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

ज्योतिषी – ''तुमचा मोठा मुलगा भाग्यवान आहे. त्याच्या मागे पुढे मोटारी धावतील!''


बाई खुष झाल्या. ज्योतिषी पुढे म्हणाला, ''दुसरा मुलगा नेहमी हजारोंच्या नोटांनी खेळेल! हे ऐकून बाई बेदह खुष झाली. ज्योतिषाला दक्षिणा देऊन लगबगीने घरी आली आणि ही गोष्ट नवऱ्याला सांगितली. नवरा बिचारा डोक्याला हात धरून बसला. ''काय हो, काय झाले?''

नवरा – ''अगं, एक ट्राफिक पोलीस होईल व दुसरा बँकेत कॅशियर... मी राजपत्रित (गॅझेटेड) अधिकारी झालो ते फुकट गेले!''

## रविंद्रनाथ टागोरांच्या कविता

(मूळ इंग्रजीत)

मनुष्य जेव्हा शहाणा होईल
तेव्हा त्याला स्वतःचे
बालपण आठवावे
म्हणून ईश्वर थांबलेला असतो



**मूळ इंग्रजी कविता – रविंद्रनाथ टागोर**
**मराठी अनुवाद – अरविंद ब्राम्हणे,**
भिंगार मो. ९४०३७३४२८१

## स्त्री स्वास्थ्याचे कानमंत्र आरोग्य सखी

**थायरॉइडचे हार्मोन्स (अंतःस्राव) म्हणजे काय?**

आपल्या शरीरामध्ये एकूण ११ अंतःस्रावी ग्रंथी असतात. त्या विशिष्ट प्रकारचा स्राव तयार करतात. या स्रावावर शरीरातील चयापचय प्रक्रिया, शरीराची वाढ, शरीरासाठी आवश्यक असणारी ऊर्जा या सर्व क्रिया अवलंबून असतात. ते शरीरातील अवयव, पेशी, स्नायू यांचे कार्य सुरळीत चालण्यासाठी प्रत्येक मिनिटाला स्रवणे गरजेचे असते. या ११ अंतःस्रावी ग्रंथींपैकी पियुषिका (पिट्युटरी) ग्रंथी एक अंतःस्राव निर्माण करते. तिलाच थायरॉइड स्टिम्युलेटिंग हार्मोन्स (TSH) म्हणतात. पिट्युटरी ग्रंथीच्या चालनेमुळे थायरॉइड ग्रंथी ७३ व ७४ हार्मोन्स योग्य प्रमाणात तयार करते. ते कमी किंवा जास्त प्रमाणात तयार होण्यालाच आपण थायरॉइड ग्रंथीचे विकार असे म्हणतो.

**थायरॉइडची रक्त तपासणी कधी करावी?**

१) वय चाळिशीच्या पुढे आहे. २) गर्भारपणात, बाळाच्या जन्मानंतर ३) एका महिन्यामध्ये दोन–तीन किलो वजन वाढले किंवा कमी झाले आहे. ४) अंगावर व चेहऱ्यावर खूप सूज जाणवते. ५) जिच्या घराण्यामध्ये थायरॉइडचा इतिहास आहे. ६) संततिनियमन थांबवल्यानंतर एक वर्ष होऊनही मूल झालेले नाही. ७) पाळी अनियमित आहे. ८) खूप थकवा जाणवत आहे. वरील लक्षणे असणाऱ्या स्त्रियांनी थायरॉइड तपासणी करून घेणे गरजेचे आहे. थायरॉइडच्या विकाराचे दोन प्रकार आहेत : (१) हायपोथायरॉडीझम (२) हायपरथायरॉडीझम

ाव कमी प्रमाणात तयार होण्याला हायपोथायरॉडीझम म्हणतात. या ग्रंथींचा स्राव कमी प्रमाणात तयार झाल्यामुळे शरीराची चयापचय प्रक्रिया मंदावते. खाल्लेल्या अन्नाचे व्यवस्थित पचन होत नाही. घेतलेल्या आहारापासून अवयवांचे, स्नायूचे, पेशींचे पोषण होत नाही, त्याऐवजी शरीरात फक्त चरबीचे थर साचून रुग्णाचे वजन वाढते.

कारणे – १) थायरॉइड ग्रंथीला वारंवार जंतुसंसर्ग झालेला असेल तर अशा वेळी थायरॉइड ग्रंथीला सूज येते. तिच्या आतील पेशी कमकुवत व नष्ट होतात. थायरॉइड ग्रंथीची कार्यक्षमता कमी होते व त्यापासून निर्माण होणारे T3, T4 स्राव कमी प्रमाणात तयार होतात. २) आयोडीनयुक्त मीठाचा वापर न केल्यामुळे ३) जन्मतःच थायरॉइड ग्रंथीची निर्मिती नसणे किंवा अकार्यक्षम असणे. लक्षणे – १) एक महिन्यामध्ये अचानक दोन–तीन किलोने वजन वाढणे किंवा कमी होणे. २) आवाज घोगरा होणे. ३) नैराश्य जाणवणे. एकाकी, उदास वाटणे. ४) विस्मरण होणे. ५) त्वचा कोरडी पडणे, थंडी सहन न होणे. ६) एकाग्रता कमी होणे. ७) वंध्यत्व किंवा वारंवार गर्भपात होणे. ८) पाळी अनियमित होणे व पाळी आल्यानंतर रक्तस्राव अति प्रमाणात होणे. ९) मलावस्तंभ होणे. १०) चेहरा निस्तेज पडणे, अति प्रमाणात केस गळणे. ११) हातापायाला मुंग्या येणे. १२) चेहऱ्यावर व सर्व शरीरावर सूज दिसणे. (क्रमशः)

**– डॉ. शारदा निर्मळ–महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहमदनगर
मोबाईल नं– ८७९३४००४००

# श्री संत सावता महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त नगरमध्ये २८ जुलैपासून अखंड हरिनाम सप्ताह

नगर – श्री संत सावता महाराज पुण्यतिथीनिमित्त उत्सव समितीच्यावतीने माळीवाडा येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले. त्याच्या मंडप उभारणी कामाचा शुभारंभ श्री विशाल गणेश मंदिरचे महंत संगम नाथ महाराज यांच्या हस्ते झाला. याप्रसंगी उत्सव समितीचे अध्यक्ष छबुनाना जाधव, कैलासराव खरपुडे, सतीश डागवाले, सुभाष राऊत, बाळासाहेब पुंड, चंद्रकांत ताठे, अनिल चेडे, सोमनाथ नागापुरे, विकास पटवेकर, संजय जाधव, महादेव भुतारे, शरद चाफेकर, भिमराज जाधव, अण्णा ढवळे, बाळासाहेब शिंदे, सुनिल पडोळे, केवटे आदि उपस्थित होते.



श्री संत सावता महाराज पुण्यतिथीनिमित्त उत्सव समितीच्यावतीने माळीवाडा येथे भव्य अखंड हरिनाम सप्ताहाच्या मंडप उभारणी कामाचा शुभारंभ श्री विशाल गणेश मंदिरचे महंत संगमनाथ महाराज यांच्या हस्ते झाला.

अध्यक्ष छबुनाना जाधव म्हणाले. गेल्या १८ वर्षांपासून माळीवाडा येथे श्री संत सावता महाराज पुण्यतिथीनिमित्त या अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात येत असते. त्यात महाराष्ट्रातील अनेक नामवंत किर्तनकार आपली सेवा या ठिकाणी देत असतात. यानिमित्त नागरिकांमध्ये धार्मिकतेची गोडी लागण्यात मदत होते. मंडळाच्या सदस्यांसह अनेकांच्या सहकार्याने हा सप्ताह कायम यशस्वी होतो. यंदाही सप्ताहाची जंगी तयारी करण्यात आली असून, आज मंडप उभारणीने त्याची सुरुवात केली आहे. २८ जुलै ते ४ ऑगस्टपर्यंत होणार्या या सप्ताहाचा भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जाधव यांनी केले.

या सप्ताहाचा शुभारंभ २८ जुलै रोजी सकाळी ११ वा. दिपप्रज्वलनाने होईल. त्यानंतर रात्री ८ वा. हभप उद्धव महाराज ढमाळ (शेवगांव) यांचे किर्तन होईल. २९ जुलै रोजी रात्री ८ वा. रामायणाचार्य हभप रामराव महाराज ढोक (नागपूर), ३० जुलै रोजी हभप निवृत्ती महाराज देशमुख (इंदोरीकर), ३१ जुलै रोजी हभप गुलाब महाराज खालकर (आर्वी, जुन्नर), १ ऑगस्ट रोजी सायं. ७ वा. मिराबाई मिरीकर (आळंदी) तसेच रात्री ९ ते ११ यावेळेत हमीद महाराज सय्यद यांच्या भारुडाचा कार्यक्रम होईल. २ ऑगस्ट रोजी हभप रामनाथ महाराज घोडके (आळंदी), ३ ऑगस्ट रोजी सायं. ४ वा. दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच रात्री ८ वा. हभप मच्छिंद्र महाराज राऊत (पिंपळा) यांचे किर्तन होईल.

४ ऑगस्ट रोजी सकाळी १० वा. हभप रामदास महाराज रक्ताटे (सय्यदमीर लोणी) यांचे काल्याचे किर्तन होईल. त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन माळीवाडा पंच मंडळ देवस्थानच्यावतीने करण्यात आले आहे. या सप्ताहा कालावधीत रोज सकाळी काकडा भजन, ज्ञानेश्वरी पारायण होईल, व्यासपीठ चालक प्रभाताई भोंग करतील. दुपारी ३ ते ५ या वेळेत श्रीनाथ, श्री पर्जन्येश्वर, श्री कपिलेश्वर, श्री संत शिरोमणी सावता महाराज, सावता महाराज, भजनी महिला मंडळाचा कार्यक्रम होईल. सायं. ५ ते ७ हरिपाठ, रात्री ८ वा. किर्तन सेवा.

सप्ताह काळात गायनाचार्य, मृदूंगाचार्य, हार्मोनियम वादक, विणेकर, चोपदार, सेवेकरी सेवा देत आहेत. सप्ताह यशस्वीतेसाठी श्री संत शिरोमणी सावता महाराज उत्सव समितीचे सर्व पदाधिकारी प्रयत्नशील आहेत.



## शब्दगंध साहित्यिक परिषदेच्या वतीने जालिंदर बोरुडे यांचा सन्मान

फिनिक्स सोशल फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष जालिंदर बोरुडे यांचा शब्दगंध साहित्यिक परिषदेच्या वतीने सन्मान करण्यात आला. कोहिनूर मंगल कार्यालयात झालेल्या शब्दगंध साहित्यिक परिषदेच्या १५ व्या राज्यस्तरीय साहित्य संमेलनाच्या स्मरणिका प्रकाशन सोहळ्याप्रसंगी आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते बोरुडे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी ज्येष्ठ साहित्यिक डॉ. संजय कळमकर, जयंत येलुलकर, ज्ञानदेव पांडुळे, प्राचार्या माहेश्वरी गावीत, शब्दगंधचे सुनिल गोसावी, राजेंद्र उदागे, शर्मिला गोसावी, आकाशवाणीचे राजेंद्र दासरी आदी उपस्थित होते.

# अरिहंत फार्मसीला 'उत्तम कॉलेज'चा दर्जा



नगर – सोनेवाडी रोडवरील अरिहंत फार्मसी'ला महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ मुंबई यांनी केलेल्या परिवेक्षणातून कॉलेजला 'उत्तम कॉलेज' असा दर्जा प्राप्त झाला आहे. दरवर्षी होणार्या पर्यवेक्षणातून कॉलेजला शिक्षणासाठी दर्जा दिला जातो, अशी माहिती प्राचार्य योगेश बाफना यांनी दिली.

यासाठी कॉलेजमधील भौतिक सुविधा, उत्तम शिक्षण पद्धती, अनुभवी शिक्षक वर्ग, ग्रंथालयातील सोयी सुविधा, विद्यार्थ्यांचा सर्वांनी विकासासाठी राबवण्यात येणार्या सर्व उपक्रम जसे पोस्टर प्रेझेंटेशन, प्रश्नमंजुषा, मॉडेल मेकिंग अशा अनेक गोष्टी तपासल्या जातात. या सर्वच गोष्टींमध्ये अरिहंत कॉलेज नेहमीच अग्रेसर ठरले. या यशामध्ये प्रा.माधुरी पवार, प्रा. शितल खंडागळे, प्रा. रुचिता पवार, प्रा. प्रतीक्षा गांधी, प्रा. वृषाली गायकवाड आदिंसह प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.



माजी विभागीय आयुक्त डॉ. पुरुषोत्तम भापकर यांच्या हस्ते सरोज आल्हाट यांना आयडॉल महाराष्ट्र पुरस्काराने गौरविण्यात आले.

# सरोज आल्हाट यांना आयडॉल महाराष्ट्र पुरस्कार प्रदान

नगर – येथील कवियत्री, लेखिका सरोज आल्हाट यांना आयडॉल महाराष्ट्र २०२४ पुरस्काराने छत्रपती संभाजीनगर येथे सन्मानित करण्यात आले. आधुनिक केसरीच्या वतीने साहित्यिक व सामाजिक क्षेत्रातील व्यक्तींचा पुरस्काराने सन्मान करण्यात आला.

ऐतिहासिक एमटीडीसी येथील मिथिकल पार्क, एलोरा केव्स येथे झालेल्या पुरस्कार प्रदान कार्यक्रमात माजी विभागीय आयुक्त डॉ. पुरुषोत्तम भापकर यांच्या हस्ते आल्हाट यांना पुरस्काराने गौरविण्यात आले.

यावेळी कवी व गीतकार डॉ. दासू वैद्य, कवी इंद्रजीत भालेराव, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे, प्लास्टिक सर्जन तथा आय.एम.ए. चे अध्यक्ष डॉ. उज्वला दहिफळे, आधुनिक केसरीचे डॉ. प्रभू गोरे, संजय व्यापारी आदी उपस्थित होते.

# जीवन समृध्द होण्यासाठी शिक्षणाची व त्यासोबत पर्यावरण संवर्धनाची गरज

## डॉ. अनघा पारगावकर यांचे प्रतिपादन; सारसनगरच्या विधाते हायस्कूल मधील विद्यार्थ्यांना शैक्षणिक किटसह स्कूल बॅगचे वाटप

नगर – जीवन समृध्द होण्यासाठी शिक्षणाची व त्यासोबत पर्यावरण संवर्धनाची गरज आहे. समाजातील मुला–मुलींना शिक्षणासाठी प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला आहे. शिक्षणाला पर्यावरण संवर्धनाची जोड मिळाल्यास त्यांचे भविष्य उज्वल राहणार आहे. यासाठी शालेय विद्यार्थ्यांनी पर्यावरण संवर्धनाच्या चळवळीत सहभागी करुन घेण्याचा प्रयत्न लायन्सच्या माध्यमातून केला जाणार असल्याचे डॉ. अनघा पारगावकर यांनी सांगितले.



सारसनगरच्या कै. दामोदर विधाते (मास्तर) हायस्कूलमध्ये लायन्स क्लब ऑफ अहमदनगर लियो क्लब ऑफ अहमदनगर व घर घर लंगर सेवा यांच्या संयुक्त विद्यमाने मुला–मुलींना शैक्षणिक साहित्याचे वाटप करताना डॉ. अनघा पारगावकर. समवेत विविध संस्थांचे पदाधिकारी, मुख्याध्यापक शिवाजी म्हस्के आदी.

लायन्स क्लब ऑफ अहमदनगर, लिओ क्लब ऑफ अहमदनगर व घर घर लंगर सेवा यांच्या संयुक्त विद्यमाने सारसनगर येथील कै. दामोदर विधाते (मास्तर) हायस्कूलमध्ये पन्नास मुला– मुलींना शैक्षणिक साहित्याच्या किटसह स्कूल बॅगचे वाटप करण्यात आले.

याप्रसंगी लायन्सच्या अध्यक्षा डॉ. अनघा पारगावकर, सचिव डॉ. सिमरन वधवा, खजिनदार अंजली कुलकर्णी, घर घर लंगर सेवाचे जनक आहुजा, कैलाश नवलानी, मुख्याध्यापक शिवाजी म्हस्के उपस्थित होते.

डॉ. सिमरन वधवा यांनी लायन्सच्या माध्यमातून फक्त समाजातील गरजूंना मदत करण्यापुरते मर्यादीत न राहता, सामाजिक बदलासाठी क्लबच्या माध्यमातून कार्य सुरु आहे. यावर्षी मुलांचे शिक्षण व पर्यावरण संवर्धनासाठी विशेष उपक्रम राबविण्यात येणार असून, या उपक्रमातंर्गत हा कार्यक्रम घेण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य असलेल्या किटचे वितरण करण्यात आले. या किटमध्ये दप्तर, चार नोटबुक व कंपासचा समावेश आहे. नवीन शैक्षणिक साहित्य मिळाल्याने शालेय विद्यार्थ्यांच्या चेहर्यावर समाधानाचे हास्य फुलले होते. विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने राबविलेल्या उपक्रमाबद्दल मुख्याध्यापक शिवाजी म्हस्के यांनी आभार मानले.

# आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये २ ते ३१ ऑगस्ट दरम्यान मोफत तपासणी शिबीर

## अँजिओग्राफी ३ हजार, सिटी स्कॅन १२५० रुपयांत, एमआरआय २५०० रुपयात व सवलतीच्या दरात शस्त्रक्रिया

नगर – राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी महाराज यांच्या १२४ व्या जन्मजयंतीनिमित्त जैन सोशल फेडरेशन संचलित श्री आनंदऋषीजी हॉस्पिटल अॅण्ड हार्ट सर्जरी सेंटर येथे २ ते ३१ ऑगस्ट या कालावधीत विविध मोफत आरोग्य तपासणी शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी महाराज यांची मानवसेवेची शिकवण व प्रबुध्द विचारक आदर्शऋषीजी म.सा.यांच्या प्रेरणेतून हे शिबिर घेण्यात येत आहेत. दररोज सकाळी १० ते दुपारी २ या कालावधीत रूग्ण तपासणी करण्यात येणार आहे. दरवर्षी राबविण्यात येणाऱ्या या मोफत आरोग्य तपासणी शिबिराचा लाभ असंख्य रूग्णांना झाला आहे. आनंदऋषीजी हॉस्पिटलला एन.ए.बी. एच.मान्यता मिळालेली असून, ही मान्यता असलेले नगर जिल्ह्यातील २६० बेडस्चे हे पहिलेच हॉस्पिटल आहे. हॉस्पिटलमधील उच्च दर्जाच्या आरोग्य सेवांचा लाभ या मोफत शिबिरांतून सर्वसामान्य रूग्णांना होणार आहे. हॉस्पिटलमध्ये एमआरआय तपासणी २५०० रुपये, सर्व प्रकारचे सिटी स्कॅन १२५० रुपये, सोनोग्राफी कलर प्रिंट व रिपोर्टसह ८०० रुपये, डिजीटल एक्स रे तपासणी २५० रुपयात केली जाणार आहे. हॉस्पिटलमध्ये प्रशस्त व अतिप्रगत पॅथॉलॉजी विभाग, आंतरराष्ट्रीय दर्जाची ब्लड बँक, ३५ अत्याधुनिक डायलेसिस मशिन विभाग, परिपूर्ण फिजिओथेरपी विभाग आहे.

या विविध मोफत आरोग्य तपासणी शिबिराला २ ऑगस्ट रोजी सुरूवात होणार आहे. पहिल्या दिवशी कॅन्सर तपासणी, स्त्रियांचे कॅन्सर तपासणी शिबीर होणार आहे. यात घसा, फुफ्फुस, आतडे, तोंडाचा इत्यादी कॅन्सर तपासणी, स्त्रियांचे कॅन्सर तपासणी, स्त्रियांमधील स्तनाच्या कॅन्सरची तपासणी मॅमोग्राफी मशिनद्वारे करण्यात येईल. स्त्रियांच्या गर्भ पिशवीच्या कॅन्सरच्या तपासणीसाठी सवलतीच्या दरात पॅपस्मीयर तपासणी केली जाणार आहे. मॅमोग्राफी तपासणी फक्त १०० रुपयात करण्यात येणार आहे. ब्रेकिथेरपी, ब्लड कॅन्सर, पॅलीयेटिव्ह कॅन्सर उपचार, सिम्टोमॅटिक कॅन्सर उपचार, लहान मुलांचे कॅन्सर उपचार इत्यादी उपचार सुविधा अत्यल्प दरात उपलब्ध आहेत. या शिबिरात कॅन्सर सर्जन डॉ.अनिकेत शिंदे, डॉ.राहुल कांडेकर, डॉ.सतिष सोनवणे, कॅन्सर फिजिशियन डॉ.दत्तात्रय अंदुरे, कॅन्सर विकार तज्ज्ञ डॉ.डॉ.लिझा बलसरा, फिजिशियन डॉ.गिरी, डॉ.गवळी, डॉ.पारधे, सर्जन डॉ.विवेक भापकर, डॉ.प्रविण मुनोत, डॉ.भास्कर जाधव, डॉ.आर.एन. पांडे, स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. रवींद्र मुथा, डॉ.सोनल बोरुडे, रेडिओलॉजीस्ट डॉ. मितेश कटारिया, डॉ.भक्ती फलके, डॉ.सोनाली सोलट, डॉ. निखिता जैन (कटारिया), पॅथॉलॉजी डॉ.मुकुंद उंडे, डॉ. सारिका झरेकर, मायक्रोबायोलॉजीस्ट डॉ.नरेंद्र पाटील रूग्ण तपासणी व मार्गदर्शन करणार आहेत.

४ ऑगस्ट रोजी पोटाचे आजार तपासणी शिबीर होईल. यात सर्व प्रकारचे यकृत (लिव्हर) व स्वादुपिंडाचे आजार तपासणी होईल. पॅन गेस्ट्रोस्कोपी २ हजार, कोलोनोस्कोपी ३ हजार रुपयांत केली जाणार आहे. पोटविकार तज्ज्ञ डॉ.राजेंद्र गुंजाळ रूग्ण तपासणी व उपचार मार्गदर्शन करतील.

९ ऑगस्ट रोजी कान, नाक, घसा व स्पीच थेरपी तपासणी शिबीर होणार आहे. या शिबिरात डॉ. सुकेशिनी गाडेकर, वाचा व भाषा उपचार तज्ज्ञ डॉ.अझर शेख रूग्ण तपासणी करणार आहेत. याचदिवशी त्वचा रोग तपासणी शिबीर होणार आहे. त्वचा लर्जी, पांढरे डाग, इसब, गजकर्ण, नायटा, केसांच्या, नखांच्या समस्या, सोरियासीस, चामखीळ, मस, कुष्ठरोगावरील तपासणी व उपचार करण्यात येतील. त्वचारोग तज्ज्ञ डॉ.भास्कर पालवे व डॉ.अमित शिंदे रूग्णांची तपासणी व मार्गदर्शन करतील.



१० ऑगस्ट दंतरोग तपासणी व उपचार शिबीर होणार आहे. यात दातांच्या नसावरील उपचार मेटल कॅप एक हजार रुपये, सिरॅमिक कॅप १५०० रुपये, २५०० रुपये, रुट कॅनल २ हजार ते ३ हजार, दातांची कवळी बसवणे ८ ते १४ हजार दरम्यान, दात साफ करणे, दातात सिमेंट भरणे प्रत्येकी ५०० रुपये आदी उपचार केले जाणार आहेत. दंतरोग तज्ज्ञ डॉ.अर्पणा पवार, डॉ.कोमल ठाणगे, डॉ.प्राची गांधी व मुलांचे दंतरोग तज्ज्ञ डॉ.प्रणव डुंगरवाल, ओरल सर्जन डॉ.स्वराज ठोले, डॉ.अभिषेक मुळे या शिबीरात उपचार करतील. दर शनिवारी दंतरोग ओपीडी मोफत असते.

११ ऑगस्ट रोजी मोफत नेत्ररोग तपासणी शिबीर होणार आहे. महावीर भवन येथील आनंदऋषीजी नेत्रालय येथे होणाऱ्या या शिबिरात अल्पदरात मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात येतील. नेत्रतज्ज्ञ डॉ.प्रकाश कांकरिया, डॉ. अशोक महाडिक, डॉ.संदीप राणे, डॉ.प्रतिक कटारिया, डॉ.विशाल तांबे, डॉ.नेहा भराडिया, डॉ.किरण शिंदे रूग्ण तपासणी व उपचार करतील. या शिबिरासाठी ८६८६४०१५१५ या मोबाईल क्रमांकावर नाव नोंदणी करावी.

१२ ऑगस्ट रोजी बालरोग तपासणी शिबीर होणार आहे. यात नवजात शिशु सर्व आजारांचे निदान व उपचार, लहान मुलांच्या शस्त्रक्रिया हर्निया, डायाफ्रामॅटिक हर्निया, हायड्रोसेल, फिमोसिस, अंडिसेंड टेस्टिस व इतर आजार तपासणी करण्यात येईल. बालरोग विभागात दर शनिवारी मोफत ओपीडी सेवा देण्यात येते. शिबिरात बालरोग तज्ज्ञ डॉ.श्रेयस सुरपुरे, डॉ.वैभवी वंजारे, डॉ.सोनाली कणसे, पिडियाट्रिक सर्जन डॉ.रूपेश सिकची रूग्ण तपासणी करतील.

१४ ऑगस्ट रोजी किडनी आजार तपासणी शिबिर होणार आहे. यात अंगावर सूज येणे, लघवी कमी अथवा लाल होणे, किडनी जंतू संसर्ग, डायलेसिस रूग्णांची, कीडनी ट्रान्सप्लांट तपासणी व मार्गदर्शन केले जाणार आहे. महात्मा ज्योतीबा फुले जनआरोग्य योजने अंतर्गत डायलेसिस मोफत केले जाईल. यात नेफ्रोलॉजीस्ट डॉ. गोविंद कासट रूग्ण तपासणी करतील.

१६ ऑगस्ट रोजी एंडो युरोलॉजीकल (मूत्रपिंड, मूत्रमार्ग, मूत्राशय) स्टोन शस्त्रक्रिया, प्रोस्टेट रोग उपचार, युरेथ्रल स्ट्रीचर रोग व्यवस्थापन, पुरुष वंध्यत्व समुपदेशन, मूल्यमापन आणि व्यवस्थापन, महिलांचे मूत्र मूल्यमापन व व्यवस्थापन, मूत्र मार्गावरील उपचार, मूत्रमार्ग, मूत्राशय, प्रोस्टेट, पुरुषांचे जननेंद्रिय, अंडाशय, कर्करोग व्यवस्थापन तपासणी व उपचार शिबीर होईल. महात्मा ज्योतीबा फुले जनआरोग्य योजने अंतर्गत शस्त्रक्रिया मोफत केल्या जातील. मूत्रविकार शल्यचिकित्सक डॉ.संकेत काळपांडे शिबिरात तपासणी करतील.

१७ ऑगस्ट रोजी अस्थिरोग तपासणी, मणके व सांधेबदली शस्त्रक्रिया शिबीर होणार आहे. यात इंपोर्टेड इम्प्लांटसह संपूर्ण गुडघा प्रत्यारोपण, संपूर्ण खुबा प्रत्यारोपण इंपोर्टेड इम्प्लांटसह ६५ हजार रुपयांपुढे केले जाणार आहे. औषध खर्च वेगळा असणार आहे. यासह ए.सी.एल., रि कन्स्ट्रक्शन व ऑर्थोस्कोपी निदान केले जाणार आहे. महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजने अंतर्गत पात्र लाभार्थींच्या शस्त्रक्रिया मोफत केल्या जातील. शिबिरात अस्थिरोग तज्ज्ञ डॉ.विशाल शिंदे, डॉ. रोहन धोत्रे, स्पाईन सर्जन डॉ.अमित सुराणा, डॉ.अक्षय गादिया तपासणी करणार आहेत.

१९ ऑगस्ट रोजी मेंदूविकार व मेंदू शस्त्रक्रिया शिबीर होईल. न्यूरोलॉजीमध्ये डोके दुखी, अपस्मात, पक्षाघात, पॅरालिसीस, कंबरदुखी, नसांचे विकार, स्नायुंचे विकार, मेंदूतील जंतुसंसर्ग, मेंदूज्वर, स्मृतीभ्रंश तसेच मेंदू, मणके, मज्जारज्जू संबंधित आजार तपासणी, ट्रॉमा सर्जरी, मेंदूतील रक्तस्त्राव, स्लीपडिक्स, मणक्यातील चकती सरकणे, झटके येणे आदींवर उपचार व शस्त्रक्रिया केल्या जातील. ईईजी, ईएमजी तपासण्या ५० टक्के सवलतीच्या दरात केल्या जाणार आहेत. मेंदूविकार तज्ज्ञ डॉ.गौतम काळे, न्युरोसर्जन डॉ.शैलेंद्र मरकड रूग्ण तपासणी करतील.

२१ ऑगस्ट रोजी जनरल शस्त्रक्रिया शिबीर होणार आहे. यात सवलतीच्या दरात जनरल शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे. पेंडिक्स, इंगवायनल हर्निया शस्त्रक्रिया प्रत्येकी १० हजार रुपयांत तर हायड्रोसील शस्त्रक्रिया ४००० रुपयात केली जाईल. औषध खर्च वेगळा असेल. या शिबिरात डॉ.विवेक भापकर, डॉ.प्रविण मुनोत उपचार करणार आहेत.

२३ ऑगस्ट रोजी प्लॅस्टिक सर्जरी शिबीर होणार आहे. यात लहान मुलांच्या हाताच्या जन्मजात समस्या, व्यंग, मधुमेहामुळे होणाऱ्या जुनाट जखमा, पायाच्या जखमा, दुभंगलेले ओठ, तुटलेले कान, चेहऱ्यावरील व्रण, तोंड, गाल, ओठ, जबडा, जीभ, मान, लाळ ग्रंथीच्या साध्या व कॅन्सरच्या गाठीचे निदान व उपचार, तोंडात लाल पांढरे चट्टे, तिखट खाण्यास अडचण येणे, तोंडातील व्रण आदी समस्यांवर उपचार करण्यात येतील. प्लॅस्टिक सर्जन डॉ.माया मरकड, डॉ.दामिनी आदित्य शिबिरात तपासणी व उपचार करणार आहेत.

२५ ऑगस्ट रोजी हृदयरोग तपासणी शिबीर होणार आहे. यात ॲन्जिओग्राफी तपासणी ३ हजार रुपयांत केली जाणार आहे. हृदय शस्त्रक्रिया हृदयातील झडप बदलणे, छिद्रे बुजवणे, लहान मुलांच्या हृदयशस्त्रक्रिया व अँजिओप्लास्टी महात्मा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत मोफत केल्या जाणार आहेत. शिबिरात कार्डियाक सर्जन डॉ.स्वप्नील कर्णे, डॉ.श्रीरंग रानडे, एमडी मेडिसीन डॉ.वसंत कटारिया, कार्डिओलॉजीस्ट डॉ.राहुल अग्रवाल, डॉ.अमित थोपटे, डॉ.अनिकेत कटारिया, कार्डियाक अनेस्थेटिस्ट डॉ.राहुल एरंडे, डॉ.विनय छल्लाणी, एमडी मेडिसीन डॉ.गजेंद्र गिरी, डॉ.रविराज गवळी, डॉ. पारधे रूग्ण तपासणी करतील.

२७ ऑगस्ट रोजी स्त्रीरोग, गर्भवती महिला आरोग्य तपासणी शिबीर होणार आहे. यात दुर्बिणीव्दारे कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया, गर्भाशयाची पिशवी काढण्याची शस्त्रक्रिया, सिझेरियन प्रत्येकी १० हजार रुपये पॅकेजमध्ये केले जाईल. गर्भवती मातांची सोनोग्राफी, रक्त, लघवी इत्यादी तपासण्या शिबिरापासून पुढील महिनाभराच्या कालावधीत ५० टक्के सवलतीच्या दरात केल्या जातील. शिबिरातील गर्भवती मातांना बाळंतपणावेळी होणाऱ्या फीमध्ये ५० टक्के सवलत देण्यात येणार आहे. या शिबिरात स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ.रवींद्र मुथा, डॉ.सोनल बोरुडे रूग्ण तपासणी करतील.

२९ ऑगस्ट रोजी मधुमेह, उच्च रक्तदाब, थायरॉईड, ग्रंथीविकार संबंधित आजार तपासणी शिबीर होईल. यात कमी, जास्त रक्तदाब, जाडपणा, लवकर वयात येणे, वयात उशिरा येणे, मुलांमधील कमी उंची, पाळीतील अनियमितता, चेहऱ्यावरील अनावश्यक केस, थायरॉईड आजार, रजोनिवृत्तीच्या समस्या, चरबी संबंधित आजार, लहान मुलांमधील मधुमेह, रजोनिवृत्ती नंतरच्या समस्या, वयोवृध्दामधील हार्मोन्स समस्या, पुरुष वंध्यत्त्व आदी समस्यांवर उपचार होतील. साथीचे आजार व सर्वरोग निदान शिबीरही होईल. शिबिरात एंडोक्रायनोजीस्ट डॉ. पियुष लोढा, एमडी मेडिसीन डॉ.वसंत कटारिया, डॉ.गजेंद्र गिरी, डॉ.गवळी, डॉ. प्राजक्ता पारधे उपचार मार्गदर्शन करतील.

शिबिराची सांगते वेळी ३१ ऑगस्ट रोजी दुर्बिणीव्दारे शस्त्रक्रिया (बिनटाका) शिबीर होणार आहे. यात लॅप्रोस्कोपीव्दारे पोटातील, बेंबी, जांघेतील, हर्नियाची शस्त्रक्रिया १० हजार रुपये, पित्ताशय काढणे शस्त्रक्रिया १५ हजार रुपये, स्त्रियांच्या गर्भाशयाची पिशवी काढणे १० हजार रुपये, स्टॅपलर लेझर पाईल्स शस्त्रक्रिया १५ हजार रुपये, अपेंडिक्स शस्त्रक्रिया ४ हजार रुपये, स्त्रीयांचे बिजांडपोशावरील गाठी शस्त्रक्रिया ५ हजार रुपये, स्त्रीयांचे वंध्यत्व तपासणीसाठी गर्भनलिकेची ट्युबल पेटेन्सी टेस्ट २ हजार रुपये, स्त्रीयांची कुटुंबनियोजन लॅप्रोस्कोपी शस्त्रक्रिया ३ हजार रुपयांत केली जाईल. या शस्त्रक्रियांसाठी आय.सी.यु.,औषधे खर्च वेगळा असेल. या शिबिरात लॅप्रोस्क्रोपिक सर्जन डॉ.भास्कर जाधव, डॉ. आर.एन.पांडे, स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ.रवींद्र मुथा, डॉ.सोनल बोरुडे रूग्ण तपासणी करतील.

या शिबिराची नाव नोंदणी व अधिक माहितीसाठी ०२४१–२३२०४७३/७४/७५ या दूरध्वनी क्रमांकावर अथवा ९४०४३९९९११ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन जैन सोशल फेडरेशनतर्फे करण्यात आले आहे. हॉस्पिटल शेजारील महावीर भवन येथे फक्त ३५ रुपयांत भोजनाची व्यवस्था कार्यरत आहे. तसेच २४ तास आनंदऋषीजी ब्लड बँक कार्यरत आहे.



अहमदनगर तालुका कुस्तीगीर संघाच्या अध्यक्षपदी उत्तर महाराष्ट्र केसरी पै.युवराज करंजुले तसेच शहराध्यक्षपदी पै.शिवाजी चव्हाण यांची निवड करण्यात आली. त्यांना निवडीचे पत्र देतांना पै. काका शेळके. (छाया – लहू दळवी)

# नगर तालुका कुस्तीगीर संघाच्या अध्यक्षपदी पै. युवराज करंजुले

नगर – अहमदनगर जिल्हा कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष आ.संग्राम जगताप यांच्या निर्देशानुसार कुस्तीगीर संघाचे सचिव प्रा. डॉ.पै. संतोष भुजबळ यांच्या हस्ते नगर तालुका कुस्तीगीर संघाच्या अध्यक्ष उत्तर महाराष्ट्र केसरी पै.युवराज करंजुले व शहर कुस्तीगीर संघाच्या अध्यक्षपदी पै.शिवाजी चव्हाण यांना निवडीचे पत्र देण्यात आले. यावेळी पै. काका शेळके उपस्थित होते. यावेळी संतोष भुजबळ म्हणाले की, कुस्ती खेळाला अधिक प्रोत्साहन मिळावे यासाठी जिल्हा कुस्तीगीर संघाच्या वतीने तालुकाध्यक्ष पदाच्या निवडी जाहीर करण्यात आल्या आहेत. या माध्यमातून स्पर्धेचे आयोजन केले जाईल. आणि युवकांना कुस्ती खेळासाठी हक्काचे व्यासपीठ निर्माण होईल. आता क्रीडा स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना करिअरच्या विविध संधी उपलब्ध झाल्या आहेत तरी जास्तीत जास्त युवकांनी कुस्ती खेळाकडे वळावे. भिस्तबाग चौक येथे छत्रपती संभाजी राजे कुस्ती केंद्र च्या माध्यमातून अनेक विद्यार्थी घडवण्याचे काम सुरू आहे असे ते म्हणाले.



प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या द्वारे जगभरात १४० देशात शिकविल्या जाणाऱ्या भारताच्या प्राचीन राजयोगाची पुस्तके अभिनेते सयाजी शिंदे यांना ध्यानधारणा प्रशिक्षक ब्रह्माकुमार डॉ. दीपक हरके यांनी पुणे येथे भेट दिली व संस्थेचे आंतरराष्ट्रीय मुख्यालय माऊंट आबू भेटीचे निमंत्रण दिले.

# बाबा अमरनाथांच्या गुहेतील पवित्र घंटा नगरमध्ये

**नगरच्या भाविकाला मिळाला बाबांचा अनोखा प्रसाद**

नगर – नगरचे भाविक अमरनाथ येथील गुहेत बाबा बर्फानी यांचे दर्शन घेत असतानाच गुहेत पिंडी समोरील लावलेली एका घंटा निखळते व ती थेट नगरचा भाविक दर्शन बोरा याच्या हातात पडते. बाबा बर्फानीच्या दर्शनाचा अनोखा प्रसाद दर्शनला मिळाला आहे. नगरहून अमरनाथला गेलेल्या शिव मित्र प्रतिष्ठानच्या सदस्यांनी मोठ्या आनंदाने व भक्तिभावाने बाबांनी दिलेला घंटा रुपी प्रसाद नगरला अमली आहे. ती घंटा शहरातील गंजबाजार येथील श्री सोमेश्वर महादेव मंदिरात गुरूवर्य राजाभाऊ कोठारी यांच्या हस्ते महाआरती करून लावण्यात आली.



नगरच्या शिवभक्त प्रतिष्ठानचे सदस्य दर्शन बोरा यांना अमरनाथ येथे मिळालेली प्रसादरुपी पवित्र घंटा गंजबाजार येथील श्री सोमेश्वर महादेव मंदिरात गुरूवर्य राजाभाऊ कोठारी यांच्या हस्ते लावण्यात आली. यावेळी सुमित वर्मा यांच्यासह सदस्य.

या चमत्कारी घटनेबाबत सविस्तर माहिती देताना सुमित वर्मा म्हणाले, नगरच्या शिव मित्र प्रतिष्ठानचे सदस्य दरवर्षी नित्याने बाबा अमरनाथ दर्शन यात्रा करीत आहेत. या वर्षीच्या माझ्यासह दर्शन बोरा, साहिल सोनसळे, रोहित सोनेकर, निर्भय पिडीआर, पियूष अग्रवाल, प्रयाग मगर, मोहित वर्मा, राहुल वर्मा, राहुल मेहेर, श्रवण बोरा, शिवम सानप व यश सावेकर हे सर्वजण गुहेत बाबा अमरनाथांचे दर्शनासाठी उभे असताना अचानक एक चमत्कार घडला गुहेत वर लावलेली एक पवित्र घंटा निखळून दर्शन बोरा याच्या हातात पडली.

बाबा बर्फानीच्या दर्शनाचा अनोखा प्रसाद यावर्षी आम्हाला मिळाला आहे. ही प्रसाद रुपी घंटा अहिल्यानगरला आणण्याचे भाग्य लाभले आहे. ही पवित्र घंटा आम्ही मोठ्या आनंदाने व भक्तिभावाने सोमेश्वर महादेव मंदिरात शहरातील भाविकांच्या दर्शनासाठी लावली आहे.

यावेळी राजाभाऊ कोठारी म्हणाले, बाबा अमरनाथांच्या गुहेतील या पवित्र घंटेने बाबा अमरनाथ यांना घडताना पाहिले आहे. ही पवित्र घंटा आज आपल्या शहरात आली आहे हे आपल्यासाठी मोठी अभिमानाची गोष्ट आहे. खरं तर वस्तू निर्जीव असली तरी भावना त्या सोबत असतात. ही घंटा म्हणजे रक्षण करणारी आणि उर्जा देणारी वस्तू आहे. नगरच्या सोमेश्वर महादेव मंदिरात ही घंटा लावण्याचं मोठं भाग्य मला मिळाले आहे. सुमित वर्मा व त्याच्या सर्व सदस्यांनी मनोभावे केलेल्या यात्रेचे त्यांना मिळालेले हे फळ आहे. यावेळी उद्योजक सुभाष कायगावंकर, आनंद नांदुरकर, संकेत गुरव, अमित लड्ढा, मयुर जाधव, यश मुथ्था, प्रसाद भोसले, अनमोल कांकरिया, रमेश शहाणे व शिव मित्र प्रतिष्ठानचे सभासद उपस्थित होते.

# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाकडून आडसूळ पॉलिटेक्निकला अतिउत्तम श्रेणी

नगर – चास येथील सौ. सुंदरबाई माणिक आडसूळ पॉलिटेक्निक मधील इलेक्ट्रिकल, कॉम्प्युटर, सिव्हिल, इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन आणि मेकॅनिकल या शाखेला महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२३–२०२४ साठी अतिउत्तम (Very Good)श्रेणी प्रदान करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाच्या देखरेख समितीने महाविद्यालयात २५ मार्च २०२४ रोजी भेट दिली व त्याअंतर्गत महाविद्यालयाचे बाह्य परीक्षण करण्यात आले. यामध्ये शिक्षक आणि विद्यार्थी यामधील अध्यापन, अध्ययन, प्रयोगशाळा व त्यातील उपकरणे, नवीन उपक्रम, विद्यार्थ्यांची प्रगती प्रशासकीय बाबी, विद्यार्थ्यांशी संवाद आणि संस्था स्तरावरील शैक्षणिक कामकाजाची पाहणी करण्यात आली. प्राचार्य आर. एस. गडाख यांच्यासह सर्व विभागप्रमुखांनी माहिती समितीस सादर केली.

त्यानुसार २४ जुलै रोजी आडसूळ पॉलिटेक्निकच्या इलेक्ट्रिकल, कॉम्प्युटर, सिव्हिल, इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन, मेकॅनिकल इंजिनीअरिंग या सर्व विभागाला अतिउत्तम श्रेणी प्राप्त झाली. यामुळे विद्यार्थी आणि पालकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झालेले असून शैक्षणिक वर्ष २०२४ –२५ प्रवेशासाठी विद्यार्थ्यांची आणि पालकांची प्रथम पसंती मिळत आहे अशी माहिती पॉलिटेक्निकचे प्राचार्य आर एस गडाख यांनी दिली आहे.

याबद्दल संस्थेचे अध्यक्ष अनिरुद्ध आडसूळ, सचिव सौ. लीनाताई आडसूळ, उपाध्यक्ष विश्वनाथ आडसूळ, खजिनदार परमेश्वर आडसूळ संचालक कु. कृष्णा आडसूळ आणि संचालक मंडळ, डॉ. प्रदीप एम पाटील, डॉ. संभाजी पठारे यांनी प्राचार्य रमेश सूर्यभान गडाख, तसेच प्रथम वर्ष विभागाचे विभाग प्रमुख प्रा.जगधने एम. के., इलेक्ट्रिकल विभाग प्रमुख प्रा.पवळे एस.एस, मेकॅनिकल विभाग प्रमुख प्रा.जाधव एम.बी, कॉम्प्युटर विभाग प्रमुख प्रा. होले पी.पी, सिव्हिल विभाग प्रमुख प्रा.म्हस्के ए.ए., इलेक्टॉनिक अँड टेलिकम्युनिकेशन विभाग् प्रमुख प्रा.पाळंदे एस.सी, व सर्व विद्यार्थी, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. महाविद्यालयाचे प्राचार्य रमेश गडाख यांनी महाविद्यालयाच्या कामकाजाबद्दल समाधान व्यक्त केले



मंगल भक्त सेवा मंडळातर्फे शेंडी येथील न्यु इंग्लिश स्कूलमध्ये वह्यांचे वाटप करताना सेवेकरी किर्तीकुमार कोठारी, आप्पासाहेब उर्फ बंडुनाना सप्रे, योगेश कंठाळे, सुनील दळवी, संतोष व्यवहारे, मुख्याध्यापिका संगिता शिंदे आदी.

# मंगल भक्त सेवा मंडळाकडून शेंडी विद्यालयात वह्यांचे वाटप

नगर – अहमदनगर जिल्हा मराठा विदया प्रसारक समाज अ.नगर या संस्थेच्या न्यू इंग्लिश स्कूल, शेंडी (ता. नगर) येथे २३ जुलै रोजी इ. ५ वी ते १० वी पर्यंतच्या गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना मंगल भक्त सेवा मंडळ (ट्रस्ट), च्या वतीने शालेय साहित्य स्वरूपात फूल स्केप वहयांचे वाटप मंडळाचे सेवेकरी किर्तीकुमार कोठारी, आप्पासाहेब उर्फ बंडूनाना सप्रे, योगेश कंठाळे, सुनिल दळवी व संतोष व्यवहारे यांचे हस्ते व मंडळाचे अध्यक्ष श्री विश्वेश्वर स्वामी महाराज (राजाभाऊ कोठारी) यांच्या मार्गदर्शनातून चालणा–या विविध उपक्रमापैकी एक उपक्रम म्हणजे सामाजिक कार्य या भावनेतून करण्यात आले.

यावेळी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका संगिता शिंदे सर्व सेवकवृंद व विद्यार्थी उपस्थित होते. या प्रसंगी मंडळाचे सेवेकरी बंडूनाना सप्रे यांनी प्रातिनिधिक स्वरूपात गुरुवर्य भाऊंचा सन्मान विद्यालयाच्या वतीने स्विकारला. या प्रसंगी विदयार्थ्यांच्या चेह–यावरील आनंद व समाधान पाहुन सद्गुरू श्री शंकरबाबा महाराज व गुरुवर्य भाऊ यांनी दिलेल्या मानवतेच्या शिकवणीची आठवण झाली.

याप्रसंगी सूत्रसंचालन सुहास एकलहरे यांनी केले. मंडळाच्या उपक्रमांची माहिती असलेले व स्वतःही काही सामाजिक कार्य करणारे विद्यालयतील वरिष्ठ लिपिक सतिश इंगळे यांचे विशेष सहकार्य लाभले. विद्यालयाचे पर्यवेक्षक बाळू मुळे यांनी मंडळाचे कार्य कसे सामाजिक व कौतुकास्पद आहे हे विषद केले आणि विद्यार्थ्यांना वाटप केलेल्या शैक्षणिक साहित्याबद्दल मंडळास धन्यवाद दिले व पुढील काळात असेच सहकार्य लाभेल अशी आशा व्यक्त केली. विद्यार्थ्यांसाठी मंडळास सेवा करण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आल्याबद्दल संतोष व्यवहारे यांनी विद्यालयाचे आभार मानले.

# एव्हरेस्ट ॲबॅकस ॲकॅडमीची २६ वी राष्ट्रीय स्पर्धा

नगर – येथील एव्हरेस्ट ॲबॅकस ॲकॅडेमीच्या वतीने २६व्या नॅशनल लेवल कॉम्पिटिशनचे आयोजन द्वारका लॉन येथे करण्यात आले होते. कार्यक्रमास एशियन नोबेल रमण मॅगसेसे पुरस्कार विजेत्या पद्मश्री नीलिमा मिश्रा, राज्याचे शिक्षण उपसंचालक रमाकांत काठमोरे, जिल्हा मराठा विद्याप्रसारक समाज संस्थेचे विश्वस्त वसंतराव कापरे, सहाय्यक पो. नि. माणिक चौधरी, चित्रपट अभिनेते डॉ. सुरेश शिंदे, बालमनोविकार तज्ज्ञ तेजस्विनी आहेर, उद्योजक संदीप गडाख, जिल्हा प्राथमिक शिक्षक सहकारी बँकेचे संचालक महेंद्र भणभणे उपस्थित होते.



एव्हरेस्ट ॲबॅकस ॲकॅडमीच्या २६ व्या नॅशनल लेव्हल कॉम्पिटिशनमध्ये पुरस्कार प्राप्त विद्यार्थ्यांना पारितोषिक वितरणप्रसंगी एशियन नोबेल रॅमण मॅगेसेस पुरस्कार विजेत्या पद्मश्री निलीमा मिश्रा, वसंतराव कापरे, स.पो.नि. माणिक चौधरी, अभिनेते डॉ. सुरेश शिंदे आदी.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी एव्हरेस्ट ॲबॅकस ॲकॅडमीचे संस्थापक अशोकराव कार्ले होते. सकाळी विद्यार्थ्यांची परीक्षा झाली. ही परीक्षा पाच मिनिटांची होती. पाच मिनिटांत आराध्या संदीप साबळे हिने १७९, तर जयेश विजय निंबाळकर याने १५७ बेरीज आणि वजाबाकी केले. अवधूत सुनील पालवे यांनी मोठ्यासंख्येचे १२५ गुणाकार करून चॅम्पियन ऑफ चॅम्पियनचा मानकरी ठरला, तर इशान नितीन सब्बन याने १७३ गुणाकार केले. श्रावणी राजकुमार पवार हिने १४३ भागाकार, दिव्या ज्ञानेश्वर डोळस याने ११६ संख्यांचे वर्ग करून चॅम्पियनपद मिळवले. यावर्षीचे बेस्ट टीचर अनुजा तांबे, रेणुका दिघोळकर, शीतल गोंधळी, भारती डौले यांना घोषित करण्यात आले, तर पूनम सोनवणे यांना स्टार टीचर म्हणून गौरविण्यात आले.

समर्थ बुधवंत, ओंकार दौंड, प्रदुषा देशमुख, मनीष नकाते, प्रेमराज थोरवे या ५ विद्यार्थ्यांना ॲबॅकस मास्टर ही पदवी प्रदान केली.

ॲकॅडमीत हजारो विद्यार्थी प्रशिक्षण घेत आहेत. यावर्षी ॲकॅडमीचे महाराष्ट्रात सर्व सेंटर मिळून तब्बल ९ हजार ३०० विद्यार्थी परीक्षेला बसले. नगर येथे ८५ शाखांमधून १९१० विद्यार्थी स्पर्धेला उपस्थित होते. आराध्या कातोरे, श्रेयस देहरिया, स्मितल काळे, ज्ञानेश्वरी चन्ने, हृदयी गोरे, स्नेहल काळे, अवनी बारसे, वेदिका शेजाळ, ऋषभ नागरगोजे, सिद्धी चेमटे, वरद दळवी, पार्थ खेडकर, वेदांत विधाते, स्वराज चव्हाण, संग्राम बेरड यांनी विजेतेपद पटकावले, तर मोठ्या गटात शिवराज मेटे, श्रेया भोसले, प्रिया राऊत, युवराज ढवळे, समर्थ झिपुर्डे, सुयश आमले, अथर्व हारदे, आर्या हिंगे, ओंम गवांदे, कार्तिक तांबे, कृष्णा कोळकर, समृद्धी गोरे, संस्कृती जगताप, सोनू अहिरे, आदित्य पवार, श्रावणी पवार, कुणाल डोळस, मनीषा नकाते हे विद्यार्थी चॅम्पियन ठरले.

ॲकॅडमीची स्थापना २०१४ मध्ये झाली. ॲकॅडमीच्या मेहनती व गुणवत्तापूर्ण शिक्षिकांनी १० वर्षांत महाराष्ट्रातच नव्हे, तर ॲकॅडमीचे नाव साता समुद्रापार पोहोचवले. ॲकॅडमीत एकूण ६७२ शिक्षिका असून, त्या एकजुटीने एकमेकांच्या सहकार्याने काम करतात. या नारी शक्तीचे पद्मश्री नीलिमा मिश्रा यांनी कौतुक केले. शिक्षक उपसंचालक रमाकांत काठमोरे यांनी विद्यार्थ्यांना जीवनातील गणिताचे महत्व समजावून सांगितले.

या परीक्षेसाठी विद्यार्थ्यांची मेहनत ॲकॅडमी, शिक्षिकांचे मार्गदर्शन, पालकांचे सहकार्य लाभले. सूत्रसंचालन राष्ट्रपती पुरस्कार विजेते अमोल बागूल यांनी केले.

# चासच्या श्री नृसिंह विद्यालयातील विद्यार्थ्यांना कुस्ती व गोळा फेक, थाळी फेकचे मार्गदर्शन

**शिक्षण सप्ताहातंर्गत क्रीडा दिनानिमित्तचा उपक्रम**

नगर – चास (ता. नगर) येथील श्री नृसिंह विद्यालयामध्ये क्रीडा दिनानिमित्त विद्यार्थ्यांना कुस्ती व गोळा फेक, थाळी फेक या खेळाविषयी माहिती देऊन मैदानी खेळाचे महत्त्व सांगण्यात आले. जिल्ह्यात शिक्षण सप्ताह साजरा होत असताना क्रीडा दिनानिमित्त या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



शिक्षण सप्ताहांतर्गत क्रिडा दिनानिमित्त चास (ता.नगर) येथील श्री नृसिंह विद्यालयात विद्यार्थ्यांना कुस्ती, गोळाफेक, थाळीफेकचे मार्गदर्शन करणारे पै. नाना डोंगरे व विश्वशा मिस्कीन यांचा सन्मान करताना मुख्याध्यापक रंगनाथ सुंबे आदी.

विद्यालयाचे मुख्याध्यापक रंगनाथ सुंबे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या उपक्रमात नगर तालुका तालिम सेवा संघाचे अध्यक्ष पै. नाना डोंगरे व गोळा फेक व थाळीफेकच्या राष्ट्रीय खेळाडू विश्वेशा मिस्कीन यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

पै. नाना डोंगरे म्हणाले की, कुस्ती हा सर्वात प्राचीन खेळ असून, या खेळाने मन, शरीर व आरोग्य उत्तम राहते. कुस्ती खेळ हा फक्त मुलांसाठी नसून, मुली देखील यामध्ये आपले कर्तृत्व सिध्द करत आहे. कुस्तीसाठी भरपूर कष्ट व सरावात सातत्य असावे लागते. या खेळात राष्ट्रीय स्तरावर गेलेल्या खेळाडूंना शासकीय नोकऱ्या देखील मिळत असल्याचे स्पष्ट करुन कुस्तीसाठी व्यायाम, आहार व या खेळातील डावपेचाची त्यांनी माहिती दिली.

विश्वेशा मिस्कीन यांनी गोळा फेक व थाळीफेकमध्ये खेळाडूंना मोठी संधी आहे. मैदानी खेळाने आरोग्य सदृढ बनते. हे मान्यता प्राप्त खेळ असून, या खेळाचा ऑलिम्पिकमध्ये देखील समावेश आहे. युवकांनी आवड असलेल्या खेळाकडे करियर म्हणून पाहण्याचे त्यांनी आवाहन केले. तर मिस्कीन यांनी मैदानावर विद्यार्थ्यांना गोळा फेक व थाळी फेकचे प्रात्यक्षिक दाखवून शालेय मैदानी स्पर्धा कशा असाव्या? यावर सविस्तर मार्गदर्शन केले.

प्रास्ताविक आशिष आचारी यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बाबासाहेब घुंगार्डे यांनी केले. आभार आदम शेख यांनी मानले. याप्रसंगी विद्यालयातील विजय देवकर, स्वाती अहिरे, कल्पना ठुबे, आशंका मुळे, प्रिया जाधव, भाग्यश्री वेताळ, पुष्पवर्षा भिंगारे, महेश मुळे आदी उपस्थित होते



गुरूपौर्णिमेनिमित्त आनंदयोगमध्ये सहभागी झालेल्या साधिका. समवेत हास्यसम्राट आर.डी.बोरा, अनिल पोखरणा, सौ.सीमा मुनोत, सौ.हेमा पडोळे, सौ. उज्वला नवले, सतीश पडोळे, आर.के. सिकची आदी.

# 'आनंद योगा' मध्ये गुरुपौर्णिमा साजरी

नगर – गुरू पार्णिमाचे औचित्य साधून आनंदऋषीजी हॉस्पिटल येथे २१ जुलै रोजी अनिल मेहेर संचलित 'आनंद योग' येथे आनंद योगचे सर्व योग साधकांनी गुरूपौर्णिमा साजरी केली.

अनिल मेहेर सर सपत्निक गुरूपूजनाचा कार्यक्रम आनंदी वातावरणात पार पडला. कार्यक्रमात नगरमधील हास्यसम्राट आर.डी.बोरा व अनिल पोखरणा, सौ. सीमा मुनोत यांच्या उपस्थितीमध्ये योग वर्गातील सर्व साधकांनी भाग घेतला.

सौ. हेमा पडोळे आणि सौ. उज्वला नवले यांनी झुंबा डान्स तसेच अनिल मेहेर सरांनी सुर्य नमस्कार करून आजच्या धकाधकीच्या जीवनात आणि फास्ट फूडचे जीवनामध्ये योगाचे महत्त्व विषद केले. तसेच योगा वर्गातील अनिल धोत्रे, सतीश पडोळे सर, सौ. भंडारी, गौरव लोढा, सीए प्रविण कटारिया, सौ. निता जाधव इ. साधकांनी जीवनातील योगाचे महत्त्व पटवून दिले. सौ. नीता जाधव यांनी सुत्रसंचालन केले.

# साई एन्जल स्कूलच्या प्राचार्यपदी सोमनाथ औताडे यांची नियुक्ती

नगर – शहरातील साई एन्जल स्कूल (सी बी एस ई ) मध्ये सोमनाथ औताडे यांची २३ जुलै रोजी प्राचार्यपदी नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांचा शिक्षण क्षेत्रात २२ वर्षाचा प्राचार्य पदाचा प्रगल्भ अनुभव असल्यामुळे तसेच त्यांनी सिंगापूर येथील शाळांमध्ये Guest Lecturer म्हणून काम पाहिले आहे याचा शाळेतील मुलांना नक्कीच फायदा होईल.



साई एन्जल स्कूलचे प्राचार्यपदी नियुक्ती झाल्याबद्दल व पदभार स्विकारतांना सोमनाथ औताडे यांचा सत्कार करताना अध्यक्षा श्रीमती लता करपे, सारंगधर निर्मल, आशिष खत्री, वैभव फडतरे, श्री. देशपांडे.

शाळेच्या अध्यक्षा श्रीमती लता उत्तमराव करपे, किसान कनेक्टचे सी. एम. डी. सारंगधर निर्मल, आशीष खत्री सर, वैभव फडतरे सर, देशपांडे सर यांनी पदभार दिला व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या



आनंद योगा ग्रुप अहमदनगर अतिथी भवन, आनंदधाम येथे गुरुपौर्णिमेचे औचित्य साधून योग शिक्षक प्रकाश इवले सर, डॉ. विनय शहा सर, तसेच सेवा निवृत्त प्रोफेसर बडदे सर या सर्वांचा सर्व योग धारकांतर्फे सन्मान करण्यात आला. याप्रसंगी योग धारक शरद झंवर,दिलीप विधाते, प्रसन्न चंगेडीया, वसंत मूनोत, संजय कटारिया, राजीव बेंद्रे, संतोष गांधी, रोटरी सेंट्रल सेक्रेटरी सुनील कटारिया आदी.

# कारगील दिवसानिमित्त २६ जुलैला नगरमध्ये कार्यक्रमाचे आयोजन

नगर – २५ वा कारगील दिवस (रौप्य महोत्सवी वर्ष) २६ जुलै रोजी सकाळी १० वाजता महासैनिक लॉन्स, अहमदनगर येथे साजरा करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील वीरपत्नी, वीरमाता, वीरपिता, माजी सैनिक व माजी सैनिकांनी या कार्यक्रमास अधिकाधिक संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी केले आहे.

कर्नल चेतन गुरबक्ष, कमांडींग ऑफीसर, १७ महाराष्ट्र बटालियन यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये होणाऱ्या या कार्यक्रमात भारत मातेच्या रक्षणार्थ कारगील युद्ध तसेच इतर युद्धामध्ये हौतात्म्य पत्करलेल्या जिल्ह्यातील जवानांच्या वीरपत्नी, वीरमाता,वीरपिता तसेच युद्धामध्ये अपंगत्व आलेल्या आणि शौर्य पुरस्कारधारकांचा प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सन्मान करण्यात येणार असल्याचेही कळविण्यात आले आहे.

# श्री विशाल गणपती मंदिरास झंवर परिवाराची १ लाख २१ हजारांची मंदिर जीर्णोद्धार कार्याला देणगी

नगर – शहराचे ग्रामदैवत श्री विशाल गणपती मंदिरात प्रत्येक संकष्टी चतुर्थीला श्री गणेशयाग करण्यात येतो. २४ जुलैला झालेल्या गणेशयागाचे यजमान श्रीनिवास झंवर यांनी मंदिराच्या जीर्णोद्धार कार्याला रुपये १ लाख २१ हजारांची देणगी दिली. संकष्टी चतुर्थी निमित्त सकाळी ८.३० ते दुपारी ३ वाजे पर्यंत विधिवत गणेशयाग झाला. उद्योजक गणेश झंवर व सौ. सोनाली झंवर यांच्या हस्ते गणेशयागाच्या सर्व विधी झाले. वेद शास्त्र संपन्न घनपाठी महेशशास्त्री रेखे यांच्या मार्गदर्शनाखाली १६ ब्रम्हवृंदानी यागाचे पौरोहित्य केले. यावेळी देवस्थानच्या वतीने झंवर परिवाराचा सत्कार करून आभार मानण्यात आले.

यावेळी गणेश झंवर म्हणाले, झंवर परिवाराच्या वतीने मागील वर्षी अधिक मासानिमित्त १८ ते २७ जुलै दरम्यान श्रीरामकथा ज्ञानयज्ञाचे आयोजन नगरमध्ये केले होते. त्यास एक वर्ष पूर्ण होत असताना आम्हाला नवसाला पावणाऱ्या श्री सिद्धिविनायक गणपतीची सेवा करण्याचा योगायोग जुळून आला हे झंवर परिवाराचे भाग्य आहे. आम्ही नित्याने ग्रामदैवत विशाल गणेशची भक्ती करीत आहोत. आज देवास्थाच्या ट्रस्टींनी गणेशयाग करण्याची संधी आम्हाला दिल्याबद्दल आम्ही सर्वांचे ऋणी आहोत.


यावेळी श्री विशाल गणपती मंदिराचे खजिनदार पांडुरंग नन्नवरे, विश्वस्त माणिक विधाते, नितीन पुंड यांनी श्रीनिवास झंवर यांचा सत्कार करून देणगी दिल्याबद्दल आभार मानले. यावेळी श्रीमती नर्मदाबाई झंवर, अनिल झंवर, सौ. मंगल झंवर, अरुण झंवर, राजगोपाल झंवर, मनीष झंवर, भारती झंवर, मुकुंद झंवर, डॉ. राहुल झंवर, मिनल झंवर, सिद्धार्थ झंवर, वैष्णवी झंवर, पीयूष झंवर, प्रीती झंवर, डॉ. अनिकेत घोटणकर, प्रीतेश दुगड, सिद्धी झंवर, पार्थ झंवर, नचिकेत झंवर, वेदिका झंवर, हृद्या झंवर, पहल झंवर आदी उपस्थित होते.



श्री विशाल गणपती मंदिरात झालेल्या संकष्टी चतुर्थीच्या गणेशयागाचे यजमान श्रीनिवास झंवर यांनी श्री विशाल गणपती मंदिर जीर्णोद्धारासाठी रुपये १ लाख २१ हजारांची देणगी दिली. यावेळी ट्रस्टचे खजिनदार पांडुरंग नन्नवरे, विश्वस्त माणिक विधाते, नितीन पुंड, गणेश झंवर, श्रीमती नर्मदाबाई झंवर, अनिल झंवर, मनीष झंवर, डॉ. राहुल झंवर व डॉ. अनिकेत घोटणकर आदी.

# धम्माल मनोरंजन

## शब्दरंजन




### आडवे संकेत

१) फशी पडलेल्याची स्थिती, फजिती
४) बहुजन सुखाय
८) पिशाच, लागवड
९) जहाजावरील लुटारु
१०) बाजारचा माणूस
१२) एका मुलीचे नाव
१४) वाळूचे आगर
१६) कासोटा, ओटी
१८) छंद, नशा, कैफ
१९) शर, बाण
२०) आळशी लोकांना नेहरुजींचा संदेश
२२) या जीवनसत्त्वाअभावी मुडदुस रोग होतो
२३) संकुचित मनाचा
२४) दंश
२५) शृंगार
२६) अमावस्या
२७) विशिष्ट लेख
२९) लाख, ध्यान
३०) अंगणवाडी
३२) पात्रापात्रभाव
३४) द्यावयाचे ते
३५) इस्ट इंडिया स्थापनकर्ती
३७) शेतीमशागतीचे साधन
३९) आई, जननी
४१) चिमणीचा एक अवयव
४२) मारल्याची निशाणी
४३) स्वदेश ४५) देखावा, खेळ
४६) नल राजाची पत्नी
४७) हो म्हणून धोका देणारा

### उभे संकेत

१) फराळ
२) बरोबर, सारखे
३) ज्योतिषी ४) वाचणे, वाचविणे ५) लोक
६) एका दैनिकाचे नाव
७) तानाजी जवळील घोरपडीचे नाव
११) कुटाळांचा अड्डा
१३) कामात न येणारा
१५) काळ्या बिया असलेले एक फळ १७) सोबत राहणे
२०) या वेळी, सांप्रत काळी
२१) जितेंद्र, जयाप्रदा यांचा एक चित्रपट
२३) वाघ्याचे लाकडी भिक्षापात्र
२५) पुरावा, कोर्टात सांगितलेली माहिती
२६) कुंभाराची भट्टी
२७) चोप, ताडण
२८) एक संत
२९) पटकन
३१) लक्षणावरुन ओळखणारा
३२) वाकबगार
३३) मुंबईतील एक परिसर
३५) रामायण (टी.व्ही. सिरियल चे निर्माता) ३६) विलासी
३८) दुष्ट लोकांची शिक्षा भोगावयाची जागा ४०) दर्पण
४१) माहामारी, वाखा
४३) किंमत ४४) देह
४५) मुलाची मुलगी


### कालचे उत्तर






**प्रश्नः** जगातील सर्वात लहान पक्षी कोणता आहे? तो कोठे आढळतो?
**उत्तरः** जगामध्ये सर्वात लहान पक्षी हमींग आहे तो क्युबा या देशात आढळतो.
**प्रश्नः** जगात कोणता असा देश आहे की, ज्या देशामध्ये डास सापडणार नाही?
**उत्तरः** जगामध्ये फ्रान्स या देशात डास नाहीत.
**प्रश्नः** जगामध्ये कोणता पक्षी आहे जो वाघ या प्राण्यासारखा बोलता आणि तो कोठे आढळतो?
**उत्तरः** बिटर्न पक्षी तो दक्षिण अमेरिका या देशात आढळतो.
**प्रश्नः** जगामध्ये कोणते असे सरोवर आहे. ज्याचे बारा वर्षानंतर गोड आणि खारट पाण्यात रुपांतर होते?
**उत्तरः** तिब्बत उरुत्सो सरोवर.
**प्रश्नः** जगामध्ये सर्वात लांब बस कोठे आहे?
**उत्तरः** अमेरिका या देशात ७६ फुट लांब ११ टन वजनाची या बसमध्ये १२१ प्रवासी बसतात.
**प्रश्नः** जगामध्ये कोणता पर्वत आपला रंग प्रत्येक दिवसी बदलतो?
**उत्तरः** दक्षिण ऑस्ट्रेलिया या देशात आयर्सराफ.
**प्रश्नः** जगामध्ये प्रथमच जहाज कोठे उडाले होते आणि त्याचा चालक कोण?
**उत्तरः** १७ डिसेंबर १६०३ साली अरबीले राईट या चालकाने चालविले.
**प्रश्नः** जगात कोणत्या देशात फक्त पुरुष आहेत, त्यांची संख्या किती?
**उत्तरः** युरोप देश वेटकन सिटी, संख्या एक हजार.
**प्रश्नः** जगामध्ये कोणत्या देशात अशी नदी आहे की त्यामध्ये मासे आढळत नाहीत?
**उत्तरः** जार्डन नदी.
**प्रश्नः** जगात सर्वात लांब कालवा कोणता?
**उत्तरः** स्वालीन कालवा.
**प्रश्नः** जगामध्ये सर्वात मोठे विमानतळ कोठे आहे?
**उत्तरः** टैक्सास फोर्ट वर्थ अमेरिका.
**प्रश्नः** जगात सर्वात उंच शिखर कोणते?
**उत्तरः** माऊंट एव्हरेस्ट.
**प्रश्नः** जगात सर्वात मोठे स्टेडियम कोणते?
**उत्तरः** एक्ट्राहिव स्टेडियम पास.
**प्रश्नः** जगात सर्वात उंच मनुष्य कोणत्या देशात आहे व त्याचे नाव काय?
**उत्तरः** पाकिस्तानचा आलम चन्ना उंची ८ फुट, ६ इंच.
**प्रश्नः** जगात कोणती भाषा अशी आहे की जिला काना, मात्रा लागत नाही व तिचे नाव काय?
**उत्तरः** इंग्रजी.
**प्रश्नः** जगामध्ये सर्वात मोठा महल कोणता?
**उत्तरः** वेट्रिकल, इटली.
**प्रश्नः** जगात सर्वात लांबीचा बोगदा कोणता?
**उत्तरः** माऊंट ब्लॉक, फ्रान्स ते इटली पर्यंत ७२ कि.मी. लांबीचा.
**प्रश्नः** भारताचे राष्ट्रीय वाक्य कोणते?
**उत्तरः** सत्यमेव जयते.
**प्रश्नः** जगात सर्वात मोठी इमारत कोठे आहे?
**उत्तरः** सियर्स टावर्स, शिकागो, संयुक्त राज्य अमेरिका.
**प्रश्नः** कोणत्या देशामध्ये सर्प नाहीत?
**उत्तरः** हवाई द्विप.
**प्रश्नः** जगात सर्वात मोठे वाचनालय कोठे आहे?
**उत्तरः** मास्कोमधे, लेलीन लायब्ररी, २ कोटी पुस्तके.
**प्रश्नः** जगात सर्वात मोठा संग्रहालय कोणता?
**उत्तरः** एडवर्ड संग्रहालय.
**प्रश्नः** जगात सर्वात मोठे बंदर कोणते?
**उत्तरः** हार्वर, न्यूयार्क.
**प्रश्नः** जगात असा कोणता देश आहे जेथे सोने जास्त मिळते?
**उत्तरः** दक्षिण आफ्रिका.
**प्रश्नः** जगात असा कोणता जीव जंतू (प्राणी) आहे की तो विना पाण्याचा राहू शकतो?
**उत्तरः** अमेरिकेचा कांगारु रैट.
**प्रश्नः** कोणता देश आहे की केव्हाही गुलाम झाला नाही?
**उत्तरः** नेपाळ.
**प्रश्नः** जगात पहिली अंतराळवीर महिला कोण?
**उत्तरः** वेलेनतीना तेरेशकी.
**प्रश्नः** जगात कोणत्या देशाने कपड्यावर वर्तमानपत्र काढले?
**उत्तरः** स्पेन.
**प्रश्नः** जगातील सर्वात मोठे सिनेमागृह?
**उत्तरः** (न्यूयॉर्क) रॉक्सं

## फिल्मीरंजन





### आडवे संकेत

१) सन् १९९८ में बनी गुलाम इस फिल्म की नायीका.
३) ईश्क (फिल्म)
४) साहनी (नायक)
७) सन् २००१ में राहुल रवैल के निर्देशन में बनी इस फिल्म में सुनील शेट्टी और काजोल थे.
८) दिलही (फिल्म)
९) सन् १९९२ में के. बापय्या के निर्देशन में बनी इस फिल्म में निलम और ऋषी कपूर थे.
१२) सन् १९९९ में बनी इस फिल्म में सलमान खान, ऐश्वर्या रॉय थे.
१५) अजय देवगन, प्रतिभा सिन्हा, विवेक मुश्रान और कादर खान अभिनीत फिल्म.
१७) शहा (नायक)
२०) सन् १९९४ में कल्पना भारद्वाज की इस फिल्म में आयुश कुमार और ममता कुलकर्णी थे.
२४) मै की दिवानी हू (फिल्म)
२५) सन् १९९१ में बनी फुल बने अंगारे इस फिल्म का नायक.
२६) आयुब खान, संयुक्ता और कबीर बेदी अभिनीत फिल्म.

### उभे संकेत

१) धर्मेंद्र, राजकुमार, सुनील दत्त, कमल हसन, रीना रॉय, सारीका अभिनीत फिल्म.
२) तुषार कपूर, करिना कपूर और रिंकी खन्ना की फिल्म.
५) सन् १९८० में निर्देशक विजय आनंद की इस फिल्म में अमिताभ बच्चन, रेखा और जिनत अमान, धर्मेंद्र थे.
६) किशोर कुमार का गायक बेटा.
१०) श्रीवास्तव (संगीतकार)
११) का पंछी (फिल्म)
१३) मेहता (निर्माता)
१४) अच्छा तो हम चलते है.... यह गाना इस फिल्म का है.
१५) सन् १९९२ में राज कंवर के निर्देशन में बनी इस फिल्म में शाहरुख खान, दिव्या भारती और ऋषी कपूर थे.
१६) सन् १९९२ में इंद्रकुमार की इस फिल्म में अनिल कपूर, माधूरी दीक्षीत थे.
१८) तेरा मस्ताना (फिल्म)
१९) इस फिल्म में जैकी श्रॉफ, अमृता सिंह, जुही चावला थे.
२१) सन् १९८२ में बनी इस फिल्म में अमिताभ बच्चन का डबल रोल था.
२२) सन् १९९२ में शशिलाल नायर के इस फिल्म में जैकी श्रॉफ, डिम्पल कपाडिया, नाना पाटेकर, मजहर खान और कादर खान थे.
२३) कौशल (नायीका)

### विनोद

**विवेकः** लठ्ठ माणसं नेहमी गोड का बोलतात?
**विशालः** कडू बोललं तर पळून जाऊ शकत नाहीत म्हणून.

### मागील फिल्मी उत्तर



## सुविचार



सर्वात अधिक संकटे घेऊ न येणारा क्षण, आपल्याबरोबर येणाऱ्या संकटसोबत विजयश्रीही घेऊन येतो.

## दिनविशेष २६ जुलै २०२४

जन्मदिवस / जयंती / वाढदिवस:
१०९४: फ्लाइट सिम्युलेटर चे शोधक एडविन अल्बर्ट लिंक यांचा जन्म. (मृत्यू: ७ सप्टेंबर १९८१)
१८४४: भारतीय कलकत्ता येथील उच्च न्यायालयाचे न्यायाधीश व कलकत्ता विद्यापीठाचे पहिले भारतीय कुलगुरू गुरूदासदास बॅनर्जी यांचा जन्मदिन.
१८५६: जॉर्ज बर्नार्ड शॉ – नोबेल पारितोषिक विजेते आयरिश लेखक आणि लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्सचे (ड्डए) सहसंस्थापक (मृत्यू: २ नोव्हेंबर १९५०)
१८६५: भारतीय कवी आणि संगीतकार रजनीकांत सेन यांचा जन्म. (मृत्यू: १३ सप्टेंबर १९१०)
१८७५: कार्ल युंग – मानसशास्त्रज्ञ व मानसोपचारतज्ञ (मृत्यू: ६ जून १९६१)
१८९३: पं. कृष्णराव शंकर पंडित – ग्वाल्हेर घराण्याचे शास्त्रीय गायक. राष्ट्रपती डॉ. राजेन्द्रप्रसाद यांनी त्यांचा 'राष्ट्रीय गायक' म्हणून गौरव केला होता. (मृत्यू: २२ ऑगस्ट १९८९)
१८९४: अल्डस हक्सले – ब्रिटीश लेखक व तत्त्वज्ञ तसचं, काल्पनिक कथा व कादंबरीकार (मृत्यू: २२ नोव्हेंबर १९६३)
१८९४: वासुदेव गोविंद मायदेव – शिशुगीते हा संगीताचा प्रकार मराठी भषेत रूळविणारे महान महाराष्ट्रीयन मराठी बालगीत कवी (मृत्यू: ३० मार्च १९६९)
१९०४: फ्लाइट सिम्युलेटर चे शोधक एडविन अल्बर्ट लिंक यांचा जन्म. (मृत्यू: ७ सप्टेंबर १९८१)
१९१४: प्रसिद्ध भारतीय कवयित्री विद्यावती कोकीळ यांचा जन्मदिन.
१९२७: भारतीय क्रिकेट खेळाडू जी. एस. रामचंद यांचा जन्म.
१९२८: भारतीय–पाकिस्तानी लेखक आणि कवी इब्न–ए–सफ़ी यांचा जन्म. (मृत्यू: २५ जुलै १९८०)
१९३९: ऑस्ट्रेलियाचे २५वे पंतप्रधान जॉन हॉवर्ड यांचा जन्म.
१९४२: स्लोव्हेकियाचे पंतप्रधान व्लादिमिर मेसियर यांचा जन्म.
१९४९: थायलंडचे पंतप्रधान थाकसिन शिनावात्रा यांचा जन्म.
१९५४: व्हिटास गेरुलायटिस – अमेरिकन लॉन टेनिसपटू (मृत्यू: १७ सप्टेंबर १९९४)
१९५५: असिफ अली झरदारी – पाकिस्तानचे ११ वे राष्ट्राध्यक्ष
१९७१: खलिद महमूद – बांगलादेशी क्रिकेटपटू
१९८५: मुग्धा गोडसे – अभिनेत्री व मॉडेल
१९८६: अभिनेत्री मॉडेल मुग्धा गोडसे यांचा जन्म.
मृत्यू / पुण्यतिथी / स्मृतिदिन:
८११ ई.पुर्वः बायझेन्टाईन सम्राट निसेफोरस यांचे निधन.
१३८०: जपानी सम्राट कोम्यो यांचे निधन.
१८४३: टेक्सासच्या प्रजासत्ताकचे राष्ट्राध्यक्ष सॅम ह्युस्टन यांचे निधन.
१८६७: ग्रीसचा राजा ओट्टो यांचे निधन.
१८९१: राजेन्द्रलाल तथा राजा मित्रा – बंगालमधील प्राच्यविद्या संशोधक, एशियाटिक सोसायटीचे पहिले अध्यक्ष (१८८५), भारतीय चित्रकला, शिल्पकला, राजकीय आणि सामाजिक विषयांवरील भाष्यकार (जन्म: १५ फेब्रुवारी १८२४)
१९५२: अर्जेन्टिनाचे अध्यक्ष जॉन पेरोन यांची पत्नी एव्हा पेरोन यांचे निधन.
१९६७: भारतातील प्रसिद्ध इतिहास, संस्कृत, कला आणि साहित्यांचे अभ्यासक व दिल्ली येथील राष्ट्रीय पुरातत्व संग्रहालयाचे सह–संस्थापक वासुदेव शरण अग्रवाल यांचे निधन.
२००५: माजी कॅनडीयन हॉकीपटू जीन गिलेस मारॉटे (त्रळश्रश्रशी चर्रीिंश) यांचे निधन.
२००९: भास्कर चंदावरकर – प्रसिद्ध भारतीय सितार वादक, शैक्षणिक, चित्रपट व नाट्य संगीतकार (जन्म: १६ मार्च १९३६)
२०१०: भारतीय राजकारणी शिवकांत तिवारी यांचे निधन. (जन्म: २० डिसेंबर १९४५)
२०१५: भारतीय वकील आणि राजकारणी बिजॉय कृष्णा हांडिक यांचे निधन. (जन्म: १ डिसेंबर १९३४)

### हृदय रोग

**५. वाटलेला आवळा गाईच्या दुधा बरोबर प्यायल्याने हृदय रोगामध्ये आराम मिळते.**
**६. कोरड आवळा व खडीसाखर सम प्रमाणात घेऊन वाटून घेणे एक चमचा चूर्ण रोज पाण्याबरोबर घेतल्याने हृदयरोगात फायदा होतो.**

## रुचिदा





### खजुराची बर्फी

**साहित्यः** पाव किलो खवा, १ वाटी बारीक चिरलेले खजूर, २ टे. स्पून पिठी साखर, १ टी. स्पून साजूक तूप, बदाम किंवा काजू.
**कृतीः** एका कढईत तूप टाकून थोडा परतून घ्या. खजूर मिक्सरवर वाटून घ्या. नंतर बारीक चिरलेले बदाम, पिठीसाखर, व खजूराचे वाटण खव्यात व्यवस्थित मिसळा. ॲल्युमिनियम ट्रेला तूप लावून बर्फी पसरा. बदाम- काजू लावून सजवा. थंड झाल्यावर तुकडे करुन मुलांना डब्यात द्या.

## ‘सिद्धार्थ वाणी’

उपप्रवर्तक श्री सिद्धार्थमुनीजी तथा महासतीजी डॉ. सौम्याश्रीजी आदि ठाणा ३ उनका चातुर्मास सावेडी मे है।



आज दुबई वरुन दोन हलान मुले आले, त्यांनी आज व्याख्यान दिले, त्यांनी ’डौणीडाम’ चे महत्त्व सांगितले. ते महावीर स्वामींचे महत्त्व सिद्धांत पटवून दिले, त्या मुलाचे नाव आहे, जैनम (११ वर्षे) व जिवीका (९ वर्षे) चे आहे, एवढ्या लहान वयात त्यांनी व्याख्यान दिले, जैनम व जिवीका यांना दुबईमध्ये त्यांच्या आईने २०२० मध्ये कोरोना काळात तेव्हा जैनम (७) वर्षांचाच व जिवीका (४) वर्षांचीच असताना सामायिक, प्रतिक्रमण आवश्यक सुप्र आदी अवघ्या १५ दिवसातच शिकवले तेही इंग्रजी मध्ये अनुवाद करुन त्यानंतर दरवर्षी किमान पंधरा जैन पुस्तकांचे अध्ययन केले, कमी वयातच त्यांनी त्यांचे स्वतःचे यु ट्यूब चॅनल सुरू केले व त्यावरुन सर्व लोकांना जैनीजमचे महत्त्व पटवून सांगतात. आपल्या रोजच्या जीवनात भगवान महावीर स्वामींनी सांगितल्या प्रमाणे नऊ तत्त्व पाळुन जीवनाचे सार्थक होते, ‘जैनीजम’ आपल्याला कसे मार्गदर्शन करते व आपले जीवन कसे सुखकर बनवते ते थोडक्यात पाहु या.

### ‘नऊ तत्व’

१) नवकार मंत्र : हा रोज सकाळी उठल्या उठल्या म्हणेल तर आपला पुर्ण दिवस सकारात्मक ऊर्जेने जातो.

२) विनय : भगवान महावीरांची शिकवण आहे, विनय हाच धर्माचा मुळ मंत्र आहे, आपण जर रोज आपल्या आई-वडील व घरातील ज्येष्ठ व्यक्तीचे, तसेच गुरुंचे पाया पडून आशिर्वाद घेतले तर त्यांच्याकडून मिळालेले आशिर्वाद आपल्याला येणाऱ्या संकटाला सामोरे जाण्याचे बळ मिळते.

३) अनुकंपा (दया) : भगवान महावीरांनी सांगिले की, आपल्या प्रत्येक कृतीमध्ये दया दिसली पाहिजे.

४) जयना : भगवान महावीर स्वामींनी चांगला मंत्र दिला ‘‘जीओ और जीने दो’’

५) विवेक : प्रभुनी सांगितले की आपल्या प्रत्येक निर्णयात, बोलण्यात विवेक दिसला पाहिजे.

६) वेळेचे महत्त्व : आपण सर्वच काम वेळेत करत गेलो तर आपण सर्वांनाच वेळ देवू शकतो, म्हणूनच म्हटले आहे ‘टाईम इज मनी’

७) वेळेचे महत्त्व : जैन धर्मात बत्तीस प्रकारचे आगम आहे. जैन आगम हे प्रभु महावीर स्वामींच्या उपदेशावर आधारित आहे.

८) जय जिनेंद्र : हाय, हॅलो सोडून आपण कोणत्याही व्यक्तीला भेटतो तेव्हा आपण जय जिनेंद्र म्हटले पाहिजे जेणे करुन आपण ‘जैनिजम’चे महत्त्व पटवून देते.

९) अहिंसा परमो धर्म : जैन धर्मात अहिंसेचे फार महत्त्व सांगितले आहे.

अशा प्रकारे नऊ तत्त्वाद्वारे आपण आपले जीवन सार्थक करू शाकतो.

**- सौ. सविता चोरडिया**



नगर शहरातील मालमत्ता कर सर्वे प्रक्रिया मोहिमेला सुरुवात नगर शहरातील प्रेमदान चौकातील दर्शन अपार्टमेंटचे मोजमाप करताना कंपनीचे व महापालिकेचे कर्मचारी. (छाया - धनेश कटारिया)

## ‘मालमत्ता कराच्या मुल्यांकना’बाबत शहरातील नागरिकांनी सहकार्य करावे

नगर - अहमदनगर महानगरपालिका अहमदनगरच्या हद्दीतील मालमत्ता कराच्या मूल्यांकनासाठी जीआयएस सर्वेक्षण आणि संगणकीकरणासाठी सेवा आणि सॉफ्टवेअर प्रदान करण्यासाठी मे. सीई इन्फो सिस्टम लि. (MapmyIndia), नवी दिल्ली यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ही टीम प्रत्येक मालमत्तेची डिजिटल छायाचित्रे जिओ-टैगिंग, अंतर्गत/बाह्य मोजमापांसाठी आणि त्यांचे कार्पेट/बिल्ट-अप क्षेत्र मनपा हद्दीतील नागरिकांनी नियुक्त केलेल्या कामासाठी/सर्वेक्षणासाठी सहकार्य करावे आणि त्यांना आवश्यक माहिती प्रदान करावी, असे आवाहन महापालिकेने केले आहे.

## बँकेच्या नावे बनावट फोन करून नोकरदाराची दोन लाख रुपयांची ‘ऑनलाईन फसवणूक’

नगर - आयसीआयसीआय बँकेच्या नावे आलेल्या बनावट फोनला प्रतिसाद दिल्याने नोकरदार व्यक्तीच्या क्रेडीट कार्डवरून २ लाख ३ हजार ३०४ रुपये ऑनलाईन कट झाल्याची घटना घडली आहे. सुदीप याकोब साळवे (वय ४०, रा. कायनेटीक चौक, नगर) असे फसवणूक झालेल्या नोकरदार व्यक्तीचे नाव आहे. त्यांनी मंगळवारी (२३ जुलै) दिलेल्या फिर्यादीवरून कोतवाली पोलीस ठाण्यात आलोक सिंगला (पूर्ण नाव, पत्ता नाही) नावाच्या व्यक्तीविरूध्द फसवणूक व माहिती तंत्रज्ञान कलमानुसार गुन्हा दाखल केला आहे.

फिर्यादी हे महावितरणमध्ये नाशिक येथे नोकरीला आहे. त्यांचे कुटुंब नगर शहरातील कायनेटीक चौक परिसरात राहते. ते शनिवार व रविवारी नगरमध्ये येत असतात. गेल्या शनिवारी (दि.२०) दुपारी ते नगरमधील घरी असताना त्यांच्या मोबाईल नंबरवर एक अनोळखी व्यक्तीने फोन केला. फोन करणार्या व्यक्तीने फिर्यादी यांना आयसीआयसीआय बँकेमधून आलोक सिंगला बोलत असल्याचे सांगितले व तुमच्या क्रेडीट कार्डचा ‘सीपीपी’ काढून टाकायचा आहे त्यासाठी बँकेचे ॲपप डाऊनलोड करा असे सांगितले. फिर्यादी यांनी त्या व्यक्तीवर विश्वास ठेऊन आयसीआयसीआय बँकेचे ॲप मोबाईलमध्ये डाऊनलोड केले.

त्यानंतर त्यांच्या मोबाईलवर आलेला ओटीपी ॲरटोरीड झाला व काही वेळातच त्यांच्या आयसीआयसीआय बँकेच्या क्रेडीट कार्डवरून एक लाख एक हजार ६५२ रुपये कट झाल्याचा मेसेज आला. काही वेळानंतर पुन्हा एक लाख एक हजार ६५२ रूपये कट झाल्याचा मेसेज आला. फिर्यादी यांनी त्या व्यक्तीला क्रेडीट कार्डवरून पैसे कट झाल्याचे सांगितले असता त्याने तुमचे पैसे २४ तासांत तुमच्या क्रेडीट कार्डवर पुन्हा जमा होतील असे सांगितले. दरम्यान, फिर्यादी यांना पैसे न आल्याने आपली फसवणूक झाल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यांनी सुरूवातीला ऑनलॉईन तक्रार दाखल केली व नंतर कोतवाली पोलिसांत फिर्याद दिली आहे. पोलीस निरीक्षक प्रताप दराडे अधिक तपास करत आहेत.

## शिक्षण क्षेत्रातील प्रश्न सोडविण्यासाठी ६ ऑगस्ट रोजी राज्यभर ‘आंदोलन’

नगर - राज्य शासनाने शिक्षण क्षेत्रातील प्रश्न त्वरित सोडवावेत अन्यथा ६ ऑगस्ट रोजी राज्यभरातील जिल्हाधिकारी कार्यालयावर धरणे आंदोलने व मोर्चे काढण्यात येतील, या बाबतचे निवेदन शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांना मुख्याध्यापक संघ महामंडळाचे राज्य उपाध्यक्ष तथा अहमदनगर जिल्हा मुख्याध्यापक संघाचे जिल्हाध्यक्ष प्राचार्य सुनील पंडित यांनी दिले. याप्रसंगी शिर्डी लोकसभा मतदारसंघाचे माजी खा.सदाशिव लोखंडे, महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे कोषाध्यक्ष प्रसाद सामलेटी व संस्थाचालक संघाचे उमेश रेखे आदीउपस्थित होते.



शिक्षण क्षेत्रातील प्रश्न त्वरित सोडवावेत, याबाबतचे निवेदन शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांना मुख्याध्यापक संघ महामंडळाचे उपाध्यक्ष तथा अहमदनगर जिल्हा मुख्याध्यापक संघाचे जिल्हाध्यक्ष प्राचार्य सुनील पंडित यांनी दिले.

ना. दीपक केसरकर यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, संचमान्यते संदर्भातील नवीन १५ मार्च २०२४ चा आदेश रद्द करून, जुन्या आदेशानुसार संचमान्यता करण्यात यावी. शिक्षक- शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी जुनी पेन्शन योजना जाहीर करावी. पवित्र पोर्टल मधील शिक्षक नियुक्ती लवकरात लवकर करावी, अथवा संस्थेला शिक्षक नियुक्तीसाठी परवानगी द्यावी. शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या मान्यता मिळाव्यात. अल्पभाषिक व अल्पसंख्याक शाळातील रिक्त पदांची १००% शिक्षक भरती करण्याची परवानगी मिळावी. प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेला टप्पा अनुदान प्रचलित नियमानुसार शाळेच्या वयाचा विचार करून शंभर टक्के जाहीर करावे. वेतनेतर अनुदान सातव्या वेतन आयोगानुसार लगतच्या वर्षाच्या वेतन अनुदानावर मिळावे. मार्च २०२४ च्या सेवकसंच शासन निर्णयात दुरुस्ती करावी. वरिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर भरतीसाठी परवानगी मिळावी. मूल्यांकनात पात्र ठरलेल्या सर्व शाळा कॉलेजला अनुदान जाहीर करावे. अनुदानासाठी पात्र ठरणाऱ्या वरिष्ठ महाविद्यालयांना अनुदान जाहीर करावे आदि मागण्या निवेदनात करण्यात आल्या आहेत.

या मागण्या संदर्भात ६ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता मुख्याध्यापक संघ महामंडळाच्या वतीने जिल्ह्याच्या प्रत्येक जिल्हाधिकारी कार्यालयावर ६ ऑगस्ट रोजी जिल्ह्यातील सर्व प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व वरिष्ठ महाविद्यालय शिक्षक- शिक्षकेतर कर्मचारी, मुख्याध्यापक, संस्थाचालक, पालक संघटनांना या धरणे आंदोलनात सहभागी होणार आहेत, असे प्राचार्य सुनील पंडित यांनी सांगितले.

या संदर्भात धरणे आंदोलनाचे नियोजन करण्यासाठी सर्व प्राथ., माध्य., उच्च माध्य. मुख्याध्यापक, शिक्षक -शिक्षकेतर समन्वय समितीची बैठक ३ ऑगस्ट रोजी दुपारी १ वाजता माध्य शिक्षक सोसायटी, सबजेल चौक, अहमदनगर येथे होणार असून उपस्थित राहावे असे आवाहन. अध्यक्ष सुनील पंडित, कार्याध्यक्ष राजेंद्र सोनवणे व सरचिटणीस मिथुन डोंगरे यांनी केले आहे.

## माध्य. शिक्षक सोसायटीच्या दोघांचे संचालकपदासह सभासदत्व रद्द

**सेवानिवृत्तीनंतर देखील पाहत होते कारभार, विरोधी संचालकांच्या तक्रारीवरुन उचलबांगडी**

नगर - अहमदनगर जिल्हा माध्यमिक शिक्षक सोसायटी मधील दोन संचालकांचे सभासदत्व रद्द करण्याचे आदेश जिल्हा उपनिबंधक गणेश पुरी यांनी काढले आहे. संस्थेचे संचालक धोंडीबा खंडू राक्षे व काकासाहेब मुरलीधर घुले हे शिक्षक म्हणून सेवानिवृत्त झाले असताना देखील सोसायटीत संचालक म्हणून कार्यरत होते. विरोधी संचलकांनी जिल्हा उपनिबंधक कार्यालयाकडे केलेल्या तक्रारीवरुन त्यांचे संचालक व सभासदत्व रद्द करण्यात आले आहे.

माध्यमिक शिक्षक सोसायटीचे संचालक धोंडीबा राक्षे हे ३१ मे २०२३ रोजी व काकासाहेब घुले हे ३१ मे २०२४ रोजी निवृत्त झालेले होते. संस्थेच्या घटनेच्या उपविधीनुसार ज्या दिवशी शिक्षक निवृत्त होतो, त्याच दिवशी त्याचे सभासद व रद्द होत असते. परंतु या दोन्ही संचालकांनी अजूनही आपले संचालकपद कायम ठेवलेले होते. यावरुन विरोधी संचालक आप्पासाहेब शिंदे, बाबासाहेब बोडखे, महेंद्र हिंगे व वसंत खेडकर या संचालकांनी त्यांच्या विरोधात जिल्हा उपनिबंधक कार्यालयाकडे तक्रार करुन, सेवानिवृत्त झालेले दोन्ही संचालक संस्थेच्या घटनेचे उल्लंघन करुन संचालक पदाचा दुरुपयोग करीत असल्याचा आरोप केला होता. तर संस्थेच्या घटनेनुसार दोन्ही संचालकांचे सभासदत्व व संचालक पद रद्द करण्याची मागणे केली होती.

या तक्रारीची दखल घेऊन महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ मधील तसेच संस्थेच्या मंजूर उपविधीतील तरतुदीस अनुसरून राक्षे व घुले यांचे सभासदत्व संपुष्टात येत असल्याचे जिल्हा उपनिबंधक यांनी पत्रात म्हंटले आहे. तर याबाबत कार्यवाही करण्याचे लेखी पत्र सोसायटीचे चेअरमन व व्यवस्थापकांना काढले आहे.

## शिक्षकांना सरसकट निवड श्रेणी लागू करावी अन्यथा आंदोलन

नगर - राज्यातील खासगी अनुदानित शाळांतील डीएड किंवा बीएड अर्हताधारक शिक्षकांना सरसकट निवडश्रेणी लागू करावी यासाठी शिक्षक भारती संघटनेच्या वतीने शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर आणि शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिवांकडे पत्राद्वारे केली आहे.

इंग्रजी माध्यमांच्या आकर्षणामुळे मराठी माध्यमाच्या शाळांतील विद्यार्थ्यांची संख्या कमी झाल्यामुळे शिक्षकांचे अतिरिक्त होण्याचे प्रमाण वाढले आहे. अतिरिक्त शिक्षक नवीन शाळेत रुजू झाल्यानंतर मूळ शाळेतील सेवा ज्येष्ठता डावलली जाते. परिणामी नवीन सेवा ज्येष्ठतेनुसार शिक्षकांना निवड श्रेणीचा लाभ मिळत नाही. तसेच कमी पायाभूत पदे असलेल्या छोट्या अनुदानित शाळेत मुळातः शिक्षकांची संवर्ग संख्या वरिष्ठ वेतनश्रेणीत २० टक्के पदे उपलब्ध नसतात त्यामुळे तेथील निवडश्रेणी पात्र शिक्षकांना कधीच निवड श्रेणी अनुज्ञेय होत नाही. राज्यातील सर्वच विभागातील कर्मचाऱ्यांना आश्वासित प्रगती योजनेचा लाभ मिळतो; परंतु शिक्षकांना तो मिळत नाही. म्हणूनच अर्हताधारक शिक्षकांना सरसकट निवडश्रेणी लागू करावी, अशी मागणी शिक्षक भारती संघटनेच्या वतीने केल्याची माहिती शिक्षक भारतीचे राज्य सचिव सुनील गाडगे यांनी दिली.



सुनिल गाडगे

राज्यातील खासगी अनुदानित प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक, तांत्रिक शाळा, अध्यापक विद्यालय यामधील शिक्षक आणि शिक्षकेतरांना चट्टोपाध्याय वेतन आयोगाने केलेल्या शिफारशीवर आधारित त्रिस्तरीय वेतनश्रेणी प्राप्त करण्यासाठी अट क्र. ३ (क) नुसार निवड श्रेणी ही त्या त्या संस्थेतील व संवर्गातील वरिष्ठ वेतनश्रेणीतील २०% पदांनाच अनुज्ञेय आहे. तसेच त्या संवर्गातील किमान पाच पदे असणाऱ्या प्रवर्गाचाच निवड श्रेणीसाठी विचार करण्यात येतो ही बाब अन्यायकारक आहे असल्याचे सुनील गाडगे म्हणाले.

राज्यातील खासगी अनुदानित शाळांतील डीएड किंवा बीएड अर्हताधारक शिक्षकांना सरसकट निवडश्रेणी लागू करावी अन्यथा आंदोलन करण्याचा इशारा सुनिल गाडगे, जिल्हाध्यक्ष आप्पासाहेब जगताप, अहमदनगर महिला जिल्हाध्यक्षा सौ. आशा मगर, सोमनाथ बोंतले, जिल्हा कार्याध्यक्ष बाबासाहेब लोंढे, जिल्हासचिव विजय कराळे, उर्दू जिल्हाध्यक्ष मोहंमद समी शेख, उच्च माध्यमिकचे जिल्हाध्यक्ष रामराव काळे, जिल्हा सचिव महेश पाडेकर, कार्याध्यक्ष किशोर डोंगरे, संभाजी पवार, कार्यवाह संजय भुसारी, हनुमंत रायकर, नवनाथ घोरपडे, सुदाम दिघे, सिकंदर शेख, संजय पवार, संतोष देशमुख, किसन सोनवणे, कैलास जाधव, संतोष शेंदुरकर, संभाजी चौधरी, श्रीकांत गाडगे, रेवण घंगाळे, जॉन सोनवणे, महिला जिल्हाध्यक्ष आशा मगर, सचिव विभावरी रोकडे, कार्याध्यक्ष मीनाक्षी सूर्यवंशी, रोहिणी भोर, शकुंतला वाळुज, छाया लष्करे, जया गागरे, अनघा सासवडकर, रूपाली बोरुडे, सोनाली अकोलकर, विनाअनुदानितच्या अध्यक्षा रूपाली कुरूमकर आदींनी दिला आहे.

## केडगावच्या कोतकरकडून जगतापांची लाखो रुपयांची फसवणूक; गुन्हा दाखल

**पैसे मागितल्यावर शिवीगाळ करत दिली जीवे ठार मारण्याची धमकी**

नगर - जमीन खरेदी - विक्रीच्या व्यवहारासाठी ३० लाख रुपये घेवून ते परत न देता पैसे मागितले तर जीवे ठार मारू अशी धमकी देत एकाची फसवणूक केल्याची घटना केडगाव उपनगरातील हनुमान नगर परिसरात घडली आहे. या प्रकरणी सुनिल धोंडीबा कोतकर व सुनिता सुनिल कोतकर (रा. हनुमान नगर, केडगाव) यांच्यावर कोतवाली पोलिस ठाण्यात बुधवारी (दि.२४) सायंकाळी फसवणुकीचा गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत रुपिचंद किसनराव जगताप (रा. चोपडगाव, ता. बारामती) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी जगताप आणि कोतकर यांची ओळख होती, कोतकर यांचा जमीन खरेदी विक्रीचा व्यवसाय आहे. या व्यवसायात गुंतवणूक करण्यासाठी कोतकर याने जगताप यांच्या कडून ६ मार्च ते १२ एप्रिल २०२४ या कालावधीत ३० लाख रुपये घेतले होते. त्या रकमेच्या बदल्यात कोतकर यांनी हनुमान नगर येथे बांधलेले रो हाऊस तुमच्या नावावर करून देतो असे सांगून विश्वास संपादन केला होता.

जगताप यांनी त्याच्यावर विश्वास ठेवून पैसे दिले. मात्र त्यानंतर कोतकर याने जगताप यांच्या नावावर रो हाऊस करून देण्यास टाळाटाळ केली. तसेच पैसे देण्यासही टाळाटाळ केली. जगताप त्यांच्या कडे पैसे मागायला गेल्यावर कोतकर पती पत्नी यांनी त्यास शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिली असल्याचे फिर्यादीत म्हंटले आहे. या फिर्यादी वरून पोलिसांनी कोतकर पती पत्नी विरोधात भा.दं.वि.कलम ४०६, ४२० प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

## खासदार निलेश लंके यांच्या उपोषणास भ्रष्टाचार विरोधी जन आक्रोशचा पाठिंबा

नगर - अहमदनगर जिल्हा पोलीस दलातील गैरकारभाराविरोधात खासदार निलेश लंके यांचे जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालया समोर तिसऱ्या दिवशी देखील उपोषण सुरु आहे. या उपोषणात भ्रष्टाचार विरोधी जन आक्रोशच्या पदाधिकाऱ्यांनी सक्रीय सहभाग नोंदवून उपोषणास पाठिंबा दिला. संघटनेचे प्रदेशाध्यक्ष रघुनाथ आंबेडकर यांनी पाठिंब्याचे पत्र खासदार लंके यांना दिले. यावेळी अनंत गारदे, अशोक रोहोकले, संघटनेचे जिल्हाध्यक्ष योगेश कुलथे, दीपक साळवे, अनिल पठारे, बाबासाहेब महापुरे, बाबासाहेब डोळस आदी पदाधिकारी उपस्थित होते.



खासदार निलेश लंके यांच्या उपोषणास पाठिंब्याचे पत्र देताना भ्रष्टाचार विरोधी जन आक्रोशचे पदाधिकारी.

रघुनाथ आंबेडकर यांनी अहमदनगर जिल्हा पोलीस दलातील गैरकारभाराने जनता वैतागली आहे. सामान्य जनतेला हप्तेखोरीचा त्रास सहन करावा लागत असून, हे उपोषण सर्वसामान्य जनतेच्या मनातील उद्रेक आहे. या उपोषणामुळे पोलीस खात्यातील भ्रष्टाचार उघडकीस येत आहे. लंके यांच्या या उपोषणाने सर्वसामान्यांना न्याय मिळण्यास मदत होणार असल्याची भूमिका त्यांनी व्यक्त केली. तर प्रामुख्याने स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेमध्ये फार मोठ्या प्रमाणात प्रकरणे दडपली जातात. सत्य प्रकरणे असतानाही दिशाहीन चौकशी होत असल्याचा आरोपही त्यांनी केला.

## एलसीबीकडून दरमहा २७ कोटी ६० लाखांची हप्ते वसुली; खा.निलेश लंके यांनी जाहीर केली हप्तेखोरीची आकडेवारी

नगर - स्थानिक गुन्हे शाखेच्या आशीर्वादानेच जिल्ह्यात सर्वाधिक अवैध व्यवसाय चालतात. त्यांच्याकडून दरमहा २७ कोटी ६० लाखांची हप्ते वसुली केली जात असून वर्षभराचा वसुलीचा आकडा सुमारे ३६० कोटी रुपयांचा आहे. यात सर्वांचीच मिलीभगत आहे. त्यामुळे स्थानिक गुन्हे शाखेतील कर्मचाऱ्यांवर कारवाई झालीच पाहिजे, यासह पोलिस अधीक्षकांवरही कारवाई झाली पाहिजे, अशी मागणी खा. निलेश लंके यांनी बुधवारी (दि.२४) रात्री प्रसार माध्यमांशी बोलताना केली. राज्याच्या गृहमंत्र्यांनी व पोलिस खात्यातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी ठोस कारवाई न केल्यास हे आंदोलन राज्यभरात सुरू होईल, असा इशाराही त्यांनी यावेळी दिला.

पोलिस खात्यातील भ्रष्टाचारा विरोधात खासदार लंके यांचे सोमवारपासून उपोषण सुरू आहे. काल तिसऱ्या दिवशी तोडगा न निघाल्याने उपोषण सुरूच होते. सायंकाळी उशिरा लंके यांनी माध्यमांशी संवाद साधताना स्थानिक गुन्हे शाखेमार्फत अवैध व्यवसायिकांकडून दरमहा कशी वसुली होते याची आकडेवारी जाहीर करून पोलिस खात्यावर आरोप केला. माजी मंत्री प्राजक्त तनपुरे, जिल्हाध्यक्ष राजेंद्र फाळके यावेळी उपस्थित होते. खासदार लंके म्हणाले, आमदार तनपुरे यांनी गृहमंत्र्यांशी चर्चा केलेली आहे. फाळके यांनी नाशिकच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांश चर्चा केलेली आहे. विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे यांच्याशी चर्चा झाली आहे. पोलिस खात्याने गंभीर दखल घेऊन ठोस कारवाई न केल्यास हे आंदोलन आता राज्यभरात सुरू होईल. राज्यातील विरोधी पक्षाचे नेते त्यांच्या त्यांच्या जिल्ह्यात अशाच प्रकारे आंदोलन करतील. देश पातळीवरही आमचे नेते संसदेत भूमिका मांडतील, असे ते म्हणाले.

खासदार उपोषणाला बसलेले असताना जिल्ह्याचे पोलिस अधीक्षक तीन दिवसात स्वतः फिरकलेही नाहीत. त्यांचा रुबाब आम्ही जिरवू, असा इशारा फाळके यांनी दिला. आमदार तनपुरे यांनीही पोलिस खात्यातील गैरव्यवहारावर टीका करत कारवाईची मागणी केली. शिवसेनेचे दिवंगत नेते अनिल राठोड यांच्या पत्नी शशिकला राठोड यांनीही आंदोलन स्थळी येऊन लंके यांच्या आंदोलनाला पाठिंबा दिला.

### खा. लंके यांनी जाहिर केलेले पोलीसांचे रेट कार्ड

चंदन तस्करी, रेशनींग ४० लाख, हिरा गुटखा ६८ लाख, विमल गुटखा ६० लाख, आरएमडी गुटखा २५ लाख, नगर शहर कॅफे ५० लाख, अवैध वाळू उपसा ट्रॅक्टर २ कोटी ५० लाख, वाळू गाडी ४ कोटी ८० लाख, जेसीबी १ कोटी ४० लाख, पोकलेन ५० लाख, आयपीएल सट्टा ५० लाख, वेश्या व्यवसाय हॉटेल ३० लाख, इतर अवैध व्यवसाय ५५ लाख, मटका ७ कोटी ५५ लाख, बिंगो जुगार १ कोटी ४० लाख, मावा ३ कोटी ३० लाख, अवैध दारू विक्री हॉटेल ७५ लाख, डिझेल, पेट्रोल तस्करी १२ लाख ५० हजार, ट्रक, रिक्षा १० लाख, जुगार क्लब ७५ लाख.

## नागरिकांचे मोबाईल चोरणारा केडगावचा आरोपी पोलिसांनी पकडला

### चोरलेले ८ महागडे मोबाईल केले हस्तगत

नगर - शहर परिसरात नागरिकांचे मोबाईल चोरणारा केडगावचा आरोपी कोतवाली पोलिसांनी पकडला असून त्याच्या कडून चोरीचे ८ महागडे मोबाईल हस्तगत करण्यात आले आहेत. अजय ढोल्या चव्हाण (वय ३६, रा. दुधसागर सोसायटी, केडगांव) असे या आरोपीचे नाव आहे.

शहरातील जुन्या बस स्थानका जवळील अंबर प्लाझा बिल्डींग मध्ये असलेल्या एटीएम मध्ये पैसे काढण्यासाठी विजय भगवान मिसाळ (रा. सारसनगर) हे बुधवारी (दि.२४) सकाळी ११ च्या सुमारास गेले होते. त्यावेळी त्यांच्या पॅन्टच्या खिशातून कोणीतरी त्यांचा १५ हजार रुपये किमतीचा विवो कंपनीचा मोबाईल चोरून नेला होता. याबाबत त्यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादी वरून गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचा तपास करण्यासाठी पो.नि. प्रताप दराडे यांनी गुन्हे शोध पथकाला सूचना दिल्या.

या गुन्ह्याचा तपास सुरु केल्यावर सदर चोरीचा मोबाईल केडगाव परिसरात असल्याची माहिती मिळाली. त्यामुळे पथकाने तत्काळ केडगावच्य दुधसागर सोसायटीत जावून संशयित अजय ढोल्या चव्हाण यास ताब्यात घेतले. त्याच्या कडे विवो कंपनीचा मोबाईल मिळाला. त्याबाबत चौकशी केल्यावर त्याने सुरुवातीला उडवाउडवीची उत्तरे दिली. मात्र नंतर तो मोबाईल अंबर प्लाझा बिल्डींग मध्ये एटीएम मधून चोरल्याची कबुली दिली. त्यानंतर त्याच्या घराची झडती घेतली असता आणखी ७ महागडे मोबाईल आढळून आले. पोलिसांनी त्याला अटक करत त्याच्या कडून ८ मोबाईल हस्तगत केले.

सदरची कारवाई पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथकातील अंमलदार ए पी इनामदार, विशाल दळवी, दिपक रोहोकले, संभाजी कोतकर, भानुदास सोनवणे, संगीता बड़े, सुजय हिवाळे, सत्यजित शिंदे, तानाजी पवार, सुरज कदम, अनूप झाडबुके, अतुल काजळे, संकेत धिवर, सचिन लोळगे यांच्या पथकाने केली.



शहर परिसरात नागरिकांचे मोबाईल चोरणारा केडगावचा आरोपी मुद्देमालासह पकडल्यानंतर त्याच्या समवेत कोतवाली पोलिसांचे पथक.

